# स्वप्नफुले



डॉ. सौ. वीरा मांडवकर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | अर्पणपत्रिका | ३ |
| | अनुक्रमणिका | ४ |
| | कथा | |
| १. | एक सकाळ | ५ |
| २. | उपेक्षा | १४ |
| ३. | झुळूक | २१ |
| ४. | मनकर्णिका | २८ |
| ५. | स्वप्नफुले | ३५ |
| ६. | दरी | ४२ |
| ७. | इंद्रायणी | ५० |
| ८. | घुसमट | ६१ |
| ९. | मोबदला | ७२ |




# स्वप्नफुले

(कथासंग्रह)

डॉ. वीरा मांडवकर

**श्री आशीर्वाद एंटरप्रायजेस**
श्री निवास लक्ष्मण मोहिते
'लक्ष्मण निवास', सुतारमाळ, कोल्हापूर ४१६ ०१०

**स्वप्नफुले**
Swapnafule
© **डॉ. वीरा मांडवकर**
(Dr. Veera Mandavkar)
**इंदिरा महाविद्यालय, कळंब,**
**जि. यवतमाळ**

**प्रकाशन**
**नोव्हेंबर २०२२**

**मुखपृष्ठ**
**भरत यादव, कोल्हापूर**

**प्रकाशक**
***श्री आशीर्वाद एंटरप्रायजेस***
श्री निवास लक्ष्मण मोहिते
'लक्ष्मण निवास', सुतारमाळ
कोल्हापूर ४१६ ०१०
अक्षर जुळवणी
ओम ग्राफिक्स, कोल्हापूर

ISBN 978-81-925695-1-2

मूल्य १३० रुपये

दु:ख बाजूला सारून
सुखाची वाट दाखविणाऱ्या
आई (सौ. शकुंतला)
व
पपा (श्री. पुंडलिकराव उहाळकर)
यांना अर्पण.

आईने उत्तर दिलं नाही. ती पुढे म्हणाली, "मंजू बघ बाई, जावयांची परवानगी असेल तरच ये; पण त्यांचे डोळे तुझ्या वाटेकडे लागलेत."

फोनवरूनही मंजूला आईच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रू जाणवले. तिचा निराश जड स्वर कळला. आईने फोन ठेवल्यावरही ती कितीतरी वेळ फोन धरून रडत होती. थोड्या वेळाने भर ओसरल्यावर ती संजूजवळ आली. तो झोपण्याच्या तयारीत होता. तिच्या डोळ्यांत अश्रू पाहून त्याने एकदम काळजीने विचारलं,

"काय झालं?"

तिने आईचं बोलणं त्याच्या कानावर घातलं. आधीचा त्याचा काळजीयुक्त चेहरा बदलून तो एकदम तटस्थ झाल्यासारखा शांत झाला. जणू ती तिच्या वडिलांच्या नाही, कोणत्यातरी परक्या माणसाच्या तब्येतीविषयी बोलत होती. त्याने शांतपणे सगळं ऐकून घेतलं. सारं बोलणं झाल्यावर ती शेवटी म्हणाली,

"मग जाऊ ना मी राधापेठला?"

"हूं." त्याने हुंकार दिला आणि पांघरूण डोक्यावर घेऊन तो आडवाही झाला. त्याचा तो तसाच न कळणारा हुंकार. आताही ती त्या हुंकाराचे अर्थ शोधत राहिली. तिला संजूच्या वागण्याचं खूपखूप आश्चर्य वाटलं.

का? का हा असा वागतो? बारा वर्षांपूर्वी



# एक सकाळ

आजची सकाळ जरा वेगळीच होती. मंजूला तसं जाणवलं, तरी रोजची कामं सराइतासारखी पार पडत होती. नळाच्या पाण्याच्या खळखळाटातही तिचे विचार तिला ऐकू जात होते. काय करावं? पुन्हा तिच्या मनात प्रश्नचिन्ह उभं राहिलं. तिचं मन आणि शरीर जणू दोन वेगळ्या गोष्टी असल्यासारखे तिचे विचार आणि तिची शारीरिक हालचाल यांचा काहीच मेळ नव्हता. अगदी व्यवस्थितपणे ती आपली कामं पार पाडत होती. वर्षानुवर्षे गृहिणीपदात पूर्णपणे मुरून गेल्याचंच प्रतीक होतं ते!

तिला संजू उठल्याची चाहूल लागली. पुन्हा खळबळलेला तिच्या मनाचा भोवरा एकदम गिरकी घेऊन वर आला. भीतीची, अस्वस्थपणाची एक लाट तिच्या

शरीरभर पसरली. उगीचच तिने दारातनं वाकून संजूकडे पाहिलं. तोही नेहमीसारखाच आरशात पाहत ब्रश करीत होता. त्याचंही काम सराइतपणे चाललं होतं. तिला वाटलं आपल्या मनात जसं वादळ उठलं आहे, तसं याच्याही मनात काही चालू आहे का? की नेहमीप्रमाणे एखादा तरंगही नाही?

जाऊ दे, तिने मनाशी विचार केला. त्याच्या मनात काय चाललंय, त्यापेक्षा आपल्या मनात जे चाललंय त्याकडे बघणं आवश्यक आहे. तिने राहिलेलं काम झटकन आवरलं. स्वयंपाकाची थोडी तयारी केली आणि ती हॉलमध्ये आली. संजू वर्तमानपत्र वाचत बसला होता. ती दबकतच शेजारी सोफ्यावर बसली. त्याने तिची दखलही घेतली नाही. तिने थोडावेळ वाट पाहिली. तेवढी शांतताही तिचं धैर्य कमी करून गेली. तरीही नेटाने प्रयत्न करीत ती म्हणालीच,

"मग येऊ का मी तुमच्याबरोबर?"

कसेबसे दबकत ओठांबाहेर पडलेले मंजूचे शब्द ऐकून सगळं माहीत असूनही संजूने थंडपणे विचारलं,

"कुठे?"

तो साधा प्रश्नही मंजूला खूप कठीण वाटला. जणू तिला त्याचं उत्तरच माहीत नव्हतं किंवा ती त्या प्रश्नाचं उत्तर देऊ शकत नव्हती. क्षणभर मंजूला



गळाल्यासारखं झालं. सारा धीर एकवटून ती म्हणाली,

"कुठे म्हणजे? राधापेठला."

संजूला उत्तर माहीत असूनही आश्चर्य वाटल्यासारखं त्याने पाहिलं आणि 'हूं' म्हणून पुन्हा हातातल्या पेपरमध्ये डोकं खुपसलं. त्याच्या हुंकाराचा अर्थ मंजूला अजिबात कळला नाही. कारण कशाला? हो, नाही असे सगळे अर्थ त्यात भरलेले होते. आपल्याला नको आहे, तोच अर्थ त्यात भरलेला आहे, हे मंजू जाणून होती. तिला त्या क्षणी पुन्हा संजूची चीड आली. आपल्याशेजारी असलेला संजू आपल्यापासून किती दूर आहे, हे तिला जाणवलं. सत्य जर हेच आहे, तर कधीकधी तो आपल्याला खूप जवळ असल्यासारखा का भासतो? तिच्या मनात उलटसुलट विचारांचं थैमान माजलं. तिची तगमग आणखी वाढली. आईचा फोन आल्यापासून क्षणाक्षणाने वाढणारी तिची काळजी आता मोठा फणा काढून उभी राहिली. आईने कापऱ्या आवाजात तिला सांगितलं होतं,

"मंजू, तुझ्या बाबांचं काही खरं नाही गं. आता महिना झाला, खाटेवर आहेत."

"अगं पण आई, तू मला आधीच का नाही कळवलंस?" मंजू एकदम कळवळून बोलली. पण तिच्या शब्दांतलं फोलपण तिला स्वतःलाच जाणवलं. आईने आधी कळवलं असतं तरी ती काय करू शकणार होती?

राहिली. तिचं पुन्हा अवसान गळालं आणि ती दारातच बसून राहिली. नकोच ते जाणं. तो परत आल्यावर आपण पुन्हा त्याला म्हणून पाहू. ती स्वतःलाच समजावत राहिली. कितीतरी वेळ ती तिथेच बसून राहिली. विचार करून करून तिचं डोकं शिणून गेलं. मस्तकावर ओझं ठेवल्याप्रमाणे जड झालं. तिने डोळे मिटून घेतले.

किती वेळ गेला कुणास ठाऊक? तिच्या कपाळाला हलकासा स्पर्श झाला. तिने डोळे उघडले. समोर संजू उभा होता. जणूकाही त्याच्याही मनात कुठलंसं वादळ घोंगावून गेलं होतं. वादळ तर शमलं होतं; पण पडझडीच्या खुणा त्याच्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होत्या. त्याने तिचा हात हातात घेतला. हळुवारपणे दाबला आणि तो म्हणाला,

“चलतेस ना?”

ती अभावितपणे म्हणून गेली,

“कुठे?”

त्याचे डोळे नकळत भरून आले. तो म्हणाला,

“राधापेठला.”

तिचा तिच्या कानांवर विश्वासच बसला नाही. ती काहीच न कळल्यासारखी त्याच्याकडे बघतच राहिली. त्याच्या मनात खोलवर कुठेतरी तुटल्यासारखं झालं. त्याने तिला हात धरून उठवलं.

“तुला तुझ्या आईच्या घरी जायचं नाही का?”



घडलेल्या एका घटनेचा सल तो अजूनही असा उरात बाळगतोय. ठीक आहे, तो तुझा सल आहे. तो तुझा अपमान आहे; पण तू मला का त्यात भागीदार करतो आहेस? तुझा माझ्या बाबांवर राग आहे. त्यांच्या घराण्यावर राग आहे. पण मग माझं काय? तुला त्यांचा राग असला तरी मी का तो राग उराशी कवटाळून बसू? मीच आपल्या घराला, आपल्या प्रेमळ माहेराला अशी तोडून टाकू?

आज बारा वर्ष होत आली होती, तिने माहेरी पाऊलही टाकलं नव्हतं. लग्नात कुठल्यातरी कारणावरून तिच्या बाबांकडून संजूचा अपमान झाला होता. श्रीमंत, घरंदाज घराण्यातल्या मंजूशी सर्वसाधारण घरातल्या संजूचं लग्न जुळलं होतं. तेव्हापासूनच संजूच्या मनात कुठेतरी स्वतःचा कमीपणा सलत होता. त्यात क्षुल्लकशा कारणावरून बाबांचे कोणतेतरी शब्द त्याला बोचले होते. त्याच क्षणी आपण मंजूसह या घराची पायरी चढायची नाही, असा त्याने निश्चय केला होता आणि मनाविरुद्ध असूनही मंजूने तो पाळला होता. संजूचा स्वाभिमान मूग गिळून तिने आपला मानला होता. दुःखाचा तो कडवट घोट तिने मुकाट्याने गिळला होता.

पण आज... आज ती हे सहन करू शकत नव्हती. तिने संजूला आपल्याबरोबर चल, असं कधीच म्हटलं नव्हतं; पण त्याच्या ऑफीसच्या रस्त्यावर असलेल्या

राधापेठमध्ये जाताजाता त्याने तिला सोडायला काहीच हरकत नव्हती. त्याच्या अशा वागण्याने इतर वेळचे त्याचे सर्वच चांगले गुण तिच्या नजरेआड होत होते. त्याचा सगळा चांगुलपणा त्यामुळे नाहीसा होत होता. संजूला आपल्या मनाची एवढीही कदर असू नये? इतकी वर्ष आपण सोबत राहत आहोत. याच्या प्रत्येक हट्टाला साथ दिली. पहिल्या बाळंतपणाच्या वेळी आई रस्त्यात भेटली होती. तिने डोळ्यांत पाणी आणून जावयाला किती विनवलं होतं की, मंजूला माहेरी पाठवा; पण संजूने ऐकलं नाही. स्वतः दोन महिने सुटी घेऊन एकट्यानेच तिचं बाळंतपण पार पाडलं. त्यावेळी मंजूने कधी नव्हे इतका आपल्या दुर्दैवाला दोष दिला होता. तरीही संजूचं प्रेमळ वागणं, त्याने मंजूची घेतलेली सर्वतोपरी काळजी आणि एकंदरीतच त्याच्या वागण्यातून वेळोवेळी व्यक्त होत गेलेले तिच्यावरील अलोट प्रेम, यांमुळे ती काही प्रमाणात तरी ते दुःख विसरली होती आणि एक तडजोड म्हणून त्याचा तो हट्ट तिने मान्य केला होता.

पण आज... आज पुन्हा तसंच चित्र उमटलं होतं. आताही ती माहेरी जाण्यासाठी संजूच्या परवानगीची प्राण कंठात आणून वाट पाहत होती. ती भानावर आली, तेव्हा संजू तिथून केव्हाच उठून गेला होता, हे तिच्या लक्षात आलं. तिला आपल्या पायातील शक्तीच निघून गेल्यासारखं वाटलं. आजही संजूचा निर्णय बदलला नव्हता.



ती तशीच बांधल्यासारखी सोफ्यावर बसून राहिली.

संजूने तयारी केली. फ्रीजमधील ब्रेड-बटर खाल्लं आणि मंजूशी शब्दही न बोलता तो घराबाहेर पडला. मंजूला स्वतःची खूपच चीड आली. का आपण इतके हतबल झालो आहोत? त्याच्याशिवाय आपण कुठे जाऊ शकत नाही का? एरवी कुठेही जायला आपल्याला सोबत लागत नाही, मग आपल्याच आईच्या घरी जाताना संजूच्या सोबतीच्या कुबड्या कशाला हव्यात? तो नाही म्हणतो, हे शब्द किती दिवस बांधू शकतील आपल्याला? माहेरी जाण्याचा निर्णय आपण स्वतःच नाही का घेऊ शकत? त्याच्या माघारी आईकडे गेलो तर काय होईल? तो टाकून देईल आपल्याला? त्याचं प्रेम नाहीसं होईल लगेच? गेली बारा वर्ष आपण पूर्णतः आज्ञाधारक पत्नीसारखं, आदर्श गृहिणीसारखं हे घर सांभाळलं. मग आपल्या एका कृत्याने हे सगळं नाहीसं होऊन जाईल? नष्ट होऊन जाईल? कितीतरी विचारांचे आवर्त तिच्याभोवती गिरक्या घेऊ लागले. क्षणभर त्या झंझावातात ती फरफटल्या गेली. त्या ऊर्मीतच तिने सगळा पसारा कसाबसा आवरला. साडी बदलली आणि कपाटातली पर्स घेऊन कुलूप शोधलं. माहेरी निघण्यासाठी दारात आली. एवढं सगळं अगदी घाईघाईने केल्यावर दाराजवळ मात्र तिचे पाय थबकले. तिचा सगळा उत्साह नष्ट झाला. संजूची प्रेमळ मूर्ती नजरेसमोर उभी

मेघना घरी पोचली तेव्हा घरातली वीज गेली होती. मेघना धावतच आत शिरली. मेणबत्तीच्या अंधूक प्रकाशात तिला काहीच दिसत नव्हतं. कपाटाला, स्टूलला ठेचकाळत ती मुन्नीच्या खोलीत पोचली.

"गधडे, एवढी मोठी झाली तरी अक्कल नाही तुला. डोळे फुटले का?" आई वीजेप्रमाणे कडाडली. मेघनाने बघितलं, मुन्नी आईच्या कुशीत तोंड खुपसून मेघनाकडे भेदरलेल्या नजरेने बघत होती. आईने तिला अगदी घट्ट धरून ठेवलं होतं. वीजेचा गडगडाट झाला की मुन्नी आईला अधिकच बिलगत होती. मेघनाला ओरडून सांगावंसं वाटलं, 'आई, मी नाही, ही मुन्नी मोठी आहे. मग तिला का कळत नाही? सर्व मलाच का कळायला हवं?' पण मेघना काहीच बोलू शकली नाही. ओठातल्या शब्दांबरोबर घशातला आवंढा गिळून ती आईला खेटून बसली. तिला पुन्हा मुन्नीचा खूपखूप हेवा वाटला. वीजेच्या गडगडाटाची त्या दोघींनाही खूप भीती वाटायची. कदाचित या दोन बहिणींमध्ये फक्त हेच साम्य होतं. पण कितीही वादळवारं आलं, तरी मेघनाला आईच्या कुशीत कधीच शिरायला मिळालं नव्हतं, मिळणारही नव्हतं. कारण तिथे मुन्नी जागा अडवून बसली होती, कधीचीच!

अंधारात त्या शांतपणे बसल्या होत्या. आईला मुन्नीच्या विचारांपलीकडे जग नव्हतं. मुन्नीला तर विचारक्षमताच



त्याच्या मागे मागे जात असताना मधली सगळी बंधनं जणूकाही गळून गेलीत, असं तिला वाटलं. या अपूर्व क्षणांना ती मनातल्या मनात कुरवाळत राहिली.

❖❖❖

(पूर्वप्रसिद्धी : १. 'विदर्भरंग', दै. लोकसत्ता, नागपूर,
दि. १८–१०–२००२
२. 'रविवार पुरवणी', दै. लोकदूत, यवतमाळ,
दि. २०–१०–२००२ )

# उपेक्षा

सकाळची घाईची वेळ. नेहमीप्रमाणेच मेघनाने घरातली कामे आटोपली आणि आईला 'कॉलेजला निघते' म्हणून सांगण्यासाठी मुन्नीच्या खोलीत गेली. आई मुन्नीच्या लांबसडक केसांची वेणी घालत होती. ती थोडावेळ मुन्नीच्या केसांकडे बघत राहिली.

"निघालीस का?" आईने विचारले.

"हो." मेघना भानावर आली. चटकन आपल्या तोकड्या केसांवरून कंगवा फिरवला आणि घराबाहेर पडली. घराबाहेर आल्यावरही तिला मुन्नीचे केस आठवत राहिले. मेघनाला खरंतर केसांची किती आवड? 'पण माझ्याच्याने होणार नाही बाई' असं म्हणून आईने तिला कधीच केस वाढवू दिले नाहीत. मेघनाला क्षणभर मुन्नीच्या केसांचा हेवा



वाटला.

घरी परतताना चांगलंच अंधारून आलं होतं. कदाचित मुन्नीच्या केसांसारखं. मेघनाला आपल्याही मनात घनदाट अंधार साचल्यासारखं वाटू लागलं. घरात शिरताच आई ओरडली,

"मेघना, मुन्नीचं औषध आणलं का?"

मेघनाचं पाऊल जागीच थबकलं. कालच आईने सांगितलं होतं; पण ती साफ विसरली होती. पाय ओढतच ती पुन्हा बाहेर पडली. आभाळ भरून आलं होतं. मेघना झपाझप पावलं टाकीत औषधांच्या दुकानाकडे जाऊ लागली. दिवसा थोडं वाटणारं अंतर रात्री तिला फार जास्त वाटू लागलं. विचार सुरू होतेच. 'कशाला हा औषधांचा खर्च? मुन्नीला नाहीतरी कोणता उपयोग होतोय त्यांचा? घरात सगळी काटकसर, पण मुन्नीची औषधं मात्र वेळच्यावेळी आणलीच पाहिजेत, हा आईचा अट्टाहास कशासाठी?'

ती औषधांच्या दुकानात पोचली. तेवढ्यात लख्ख्रकन वीज चमकली. क्षणभर सगळं उजळून निघालं आणि त्यापाठोपाठ वीजेचा मोठ्याने गडगडाट झाला. आतापर्यंत साठवलेलं सगळं बळ नाहीसं झालं. हातपाय थरथरू लागले. तिने कसंबसं औषध घेतलं आणि घराकडे धाव घेतली. तेवढ्या वेळात पावसाला सुरुवात झाली होती. अधूनमधून वीजेचाही गडगडाट होत होता.

आईला अजूनच बिलगली. आईच्या डोळ्यांतून अखंड अश्रू वाहत होते. त्याक्षणी मेघनाला वाटलं, ‘आपल्याला आईने प्रेम दिलं नाही तरी जगता येईल. पण मुन्नी.... तिला जगण्यासाठी मिळतंय ते फक्त आईचं प्रेम. आणि तोच एकमेव आधार तिला आहे, जो आपल्या वैयक्तिक भावभावनांपेक्षा कितीतरी पटींनी अधिक आवश्यक आहे.’ आईबद्दल असणाऱ्या तिच्या सर्व तक्रारी क्षणार्धात दूर झाल्या. त्या दोघींना त्यांच्या छोट्याशा विश्वात सोडून ती खोलीबाहेर पडली.

❖❖❖

(पूर्वप्रसिद्धी : १. ‘रविवार पुरवणी’, दै. लोकदूत, यवतमाळ, दि. २९—१२—२००२
२. ‘साहित्य मैफिल’, दै. हिंदुस्थान, अमरावती, दि. १—६—२००३
३. ‘अक्षरगंध’, साहित्य विशेषांक, सृजन साहित्य संघ, मूर्तिजापूर, दि. १—६—२००३)



नव्हती. आणि मेघना..... मेघना आपल्या विचारविश्वातही एकटी होती, अगदी एकटी.

लहानपणी बारसं, वाढदिवस असे कोणतेच सोहळे तिच्या वाट्याला आले नव्हते. मोहिनीचा जन्म झाल्यानंतर दोन वर्षांनी मेघनाचा जन्म झाला. पण तोपर्यंत मोहिनीचं मतिमंदत्व सिद्ध झालं होतं. मोहिनी कायमची मुन्नीच राहिली. परिणामी मेघनाचं बालपणही कोमेजलं. आईचं सगळं प्रेम, सगळं कौतुक मुन्नीमध्येच खर्च होत गेलं.

आठवीत मेघनाला संस्कृतच्या परीक्षेत विशेष पारितोषिक मिळालं होतं; पण त्याच दिवशी मुन्नीने अर्ध सांडवत का असेना, पण आपल्या हाताने जेवण केलं होतं आणि आईला येणाऱ्या जाणाऱ्यांजवळ हा विषय आठ दिवस पुरला. मेघनाच्या पारितोषिकाचं कौतुक कुठे मागे पडलं, तिचं तिलाच कळलं नाही. बाबांचा कौटुंबिक सहभाग नाममात्रच होता. त्यांच्याकडून कौतुकाची अपेक्षाच व्यर्थ होती. मेघनाने पुढे या सगळ्याची सवय करून घेतली.

मेघना मुन्नीकडे पाहत होती. तितक्यात वीज आली. मुन्नीचे लोंबणारे ओठ, त्यांतून सांडणारी लाळ पाहून मेघनाला किळस वाटली. मुन्नीने तिचे निर्जीव डोळे मेघनाकडे फिरवले आणि ती विचित्र हसली. मेघनाच्या मनाचा संताप संताप झाला.

पाऊस थांबला होता. आई देवघरातला दिवा लावण्यासाठी गेली. मुन्नी सरकत सरकत मेघनाजवळ आली. भसाड्या आवाजात काहीतरी बरळायला लागली. मेघनाला क्षणभर वाटलं, मुन्नीऐवजी आपण मतिमंद असतो तर.... तर किती बरं झालं असतं. लगेच तिला त्या विचारांनी दरदरून घाम फुटला. ती पटकन उठून बाहेर अंगणात आली, जणू त्या विचारांपासून तिला दूर जायचं होतं.

आता आभाळ स्वच्छ झालं होतं. पण मेघनाचं मन मात्र अजूनही ढगाळलेलंच होतं. ‘खरंच, आपण सर्वगुणी असूनही आईचं प्रेम, माया, काळजी, कौतुक आपल्या वाट्याला कधी आलंच नाही. लहान असूनही कायम उपेक्षित. खरंतर आपलं नावच ‘उपेक्षा’ असायला हवं होतं. आणि मुन्नी..... आईने जणू आपलं सर्व जीवन तिला वाहून टाकलं आहे. त्या दोघींमध्ये आपल्याला स्थानच नाही.’ नकळत मेघनाच्या डोळ्यांत अश्रू उभे झाले. मघाच्या पावसासारखेच ते गालावरून ओघळू लागले. आईने मुन्नीला जेऊ घालणं, तिला जवळ घेणं या सगळ्याचाच राग तिच्या अश्रूंच्या रूपाने बाहेर पडू लागला. भावनाकल्लोळात मेघना इतकी बुडून गेली होती, की बाबा आल्याचेही तिला कळले नाही. तिला एकदम बाबांचा मोठा आवाजच ऐकू आला. ते आईच्या नावाने जोरजोरात हाका मारीत होते. आई आणि मेघना दोघीही बाबांजवळ गेल्या. ते मुन्नीच्या खोलीत होते.



त्यांच्या चेहऱ्यावरून संताप ओसंडून वाहत होता. आईकडे रागारागाने बघत ते ओरडले,

“या जनावराला एका खोलीत डांबून ठेव, म्हटलं होतं ना मी? बघ, माझ्या महत्त्वाच्या फाईलचे कसे तुकडे तुकडे केले हिने. आत्ताच्या आत्ता हिला पागलखान्यात नेऊन टाकतो, म्हणजे मला मोकळा श्वासतरी घेता येईल या घरात.”

आईने धावत जाऊन मुन्नीला पोटाशी घेतलं. ते भेदरलेलं कोकरूही तिला बिलगलं.

“सगळं घर कसं विद्रूप करून टाकलंय ह्या कार्टीनं.” असं बडबडत बाबा बाहेर पडले.

मेघना अजूनही गोठल्याप्रमाणे तिथेच उभी होती. तिला आपला मेंदू सुन्न झाल्यासारखा वाटला. मघाचा तो विचार आठवून एखाद्या दुःस्वप्नातून जागं व्हावं, तशी ती खडबडून जागी झाली. हळूहळू मेघनाला एक एक संदर्भ उलगडत गेले. बाबांचा या घराला नसलेला मानसिक आधार, आईचं मुन्नीला जिवापलीकडे जपणं, मुन्नीच्या डोळ्यांतली कायमची भीती हे सारखं सारखं तिच्या नजरेपुढे तरळू लागलं. आपल्या उपेक्षेपेक्षा परमेश्वराने मुन्नीची जन्मतः केलेली उपेक्षा फार भयंकर आहे.

मेघनाचा आईबद्दलचा राग कुठल्याकुठे निघून गेला. जणू तो कधी नव्हताच. ती मुन्नीजवळ गेली. मुन्नी

असल्यामुळे दोघांचा जोडा दृष्ट लागण्यासारखाच होता. आधुनिक रीतीप्रमाणे दोघांचं हिंडणंफिरणंही सुरू झालं. शांत, गंभीर सागरासारखा उदयन आणि मोकळी खळाळणाऱ्या झऱ्यासारखी मैत्रेयी. सुरुवातीला एकमेकांशी मोजकं बोलणारे, चोरून पाहणारे दोघं नंतर एकमेकांच्या हातात हात घालून गप्पा करीत फिरू लागले. स्वाभाविक प्रीतीचे बंध त्यांच्यात निर्माण झाले. तीन महिन्यांनंतरचे लग्न. ते तीन महिनेही तीन तपांप्रमाणे दीर्घ भासू लागले. मैत्रेयी आनंदाच्या झुल्यावर उंच उंच झुलत होती. पण... पण त्या दोघांना खरोखरच कुणाची दृष्ट लागली. मैत्रेयीलाच भेटायला येत असताना उदयनला अपघात झाला. क्षणभरात सगळं संपलं.

मैत्रेयीचे जणू चैतन्यच हरपले. आज चार महिन्यांनंतरही ती त्यातून सावरली नव्हती. तिची आई बराच वेळ तिच्या डोक्यावर थोपटत राहिली. आपल्या या संवेदनशील लेकीला कसं समजवावं, हेच तिला कळत नव्हतं. तेवढ्यात मधुराचा आवाज ऐकू आला. आईला तेवढंच बरं वाटलं. मधुरा मैत्रेयीची जवळची मैत्रीण. तिच्या सहवासात मैत्रेयी जरातरी खुलत असे. म्हणूनच त्या दोघींना सोडून आई बाहेर गेली. मधुरा नेहमीप्रमाणे मिष्कीलपणे म्हणाली,

“हं, काय म्हणताहेत आमच्या रडूबाई?”

मैत्रेयी रागाने दूर जाऊन बसली.



# झुळूक

“अगं मैत्रेयी, माझा डबा कुठे आहे? दे लवकर, मला उशीर होतो आहे.”

“अहो, टेबलवर भरून ठेवलाय ना! समोर असून तुम्हाला दिसत नाही.”

“काय करू? माझ्या डोळ्यांपुढे सतत तूच असतेस ना? म्हणून मला दुसरी कुठलीच गोष्ट दिसत नाही.”

“हं, राहू द्या तुमची लाडीगोडी. उशीर होतोय ना? मग बोलण्यात कशाला वेळ घालवताय?”

“मी वेळ घालवतोय? उलट तूचतर गोड गोड बोलत राहतेस, म्हणून मला उशीर होतो.”

“काय? मी बोलत राहते? लबाड कुठले?”

मैत्रेयी खळाळून हसत म्हणाली.

ओंकार तिच्या डोक्यावर टपली मारून ऑफीसला जाण्यासाठी बाहेर पडला. मैत्रेयी त्याला बाहेरपर्यंत सोडायला गेली. गाडी काढून जाता जाताही त्याने मैत्रेयीकडे पाहून गमतीने डोळा मिचकावला. 'काय हे?' असं डोळ्यांनी दटावत, पण मनातून सुखावून मैत्रेयी आत आली.

थोड्याफार फरकाने मैत्रेयीसाठी हे रोजचंच दृश्य होतं. तरीही ती दररोज ओंकार बाहेर पडल्यावरही त्या सुखावर तरंगत राहायची. ओंकार एखाद्या लहान मुलापेक्षाही खोडकर होता. विविध गमती करून मैत्रेयीला बेजार करायचं आणि ती रुसली की तिची समजूत काढायची, हा ओंकारचा आवडता उद्योग होता. मैत्रेयीलापण हे खूप हवंहवंसं वाटायचं.

आताही सोफ्यावर बसल्या बसल्या त्याच क्षणांशी खेळण्यात ती दंग होती. विचार करता करता तिला वाटलं, 'आपल्या आयुष्यात आधी ओंकार नव्हता, यावर विश्वासच बसत नाही, इतके आपण एकरूप झालेलो आहोत. आता तो जवळ नसला तरी त्याचं अस्तित्व सतत आपल्याला जाणवत राहतं.' मैत्रेयीचे विचार चालूच होते. तितक्यात तिचं वर्तमानपत्रावर लक्ष गेलं. त्यात बातमी होती - 'उदय सबनीसची संघात निवड'. तिचे डोळे उगीचंच त्या बातमीवर खिळून राहिले. 'उदय सबनीस'



कोण, हेही तिला माहीत नव्हतं. पण 'उदय' हे नाव वाचल्यावर तिच्या तरल संवेदना कुठेतरी थरारल्या. त्या नावाशी परिचित असलेली वेदना स्पंदित झाली. नकळत एक झरझरता भूतकाळाचा पडदा तिच्या डोळ्यांसमोर फडफडू लागला.

"नाही, मी नाही लग्न करणार कोणाशी." हुंदके दाबत मैत्रेयी बाबांना म्हणत होती.

"अगं, पण किती दिवस? आता चार महिने झालेत उदयनला जाऊन. तू का असा वेडा हट्ट करतेस?" बाबा अगतिकपणे म्हणाले.

"हा वेडा हट्ट नाहीये बाबा. तुम्हाला माझ्या भावना समजूनच घेता येत नाहीत. मी उदयनच्या जागी कुणालाच पाहू शकत नाही."

मैत्रेयीच्या डोळ्यांतून पुन्हा अश्रूधारा वाहू लागल्या. बाबा नाइलाजाने बाहेर पडले. आईच्या कुशीत तोंड खुपसून मैत्रेयी बराच वेळ रडत राहिली. आई तिला म्हणाली,

"माझी हळवी पोरगी ती! असं सारखं सारखं रडायचं का?" आईच्या जिव्हाळ्याने मैत्रेयीला अधिकच रडू फुटलं.

सहा महिन्यांपूर्वी उदयन आणि मैत्रेयीचा थाटामाटात साखरपुडा झाला होता. दोघंही अनुरूप

# मनकर्णिका

घणू... घणू... घण्टानाद करीत सदानंदाने गाभाऱ्याच्या दिशेने हात जोडले. त्या गंभीर नादाने देवळाच्या दगडी भिंतीही क्षणभर थरारल्या. दमदार पावलं टाकत पायऱ्या उतरणाऱ्या सदानंदाच्या चेहऱ्यावर पहाटेची कोवळी किरणं पडत होती. रोजचंच दृश्य होतं हे. वयाच्या पंधराव्या वर्षापासून सदानंद पहाटे पाचला देवळात येत असे. सहापर्यंत पूजा आटोपून घरी परत जात असे. घरापासून देवळापर्यंतची पायवाट त्यामुळे त्याला अगदी ओळखीची झाली होती. रस्त्यातली झाडं, वेली, पशू, पक्षी त्याच्या नित्य पाहणीतले होते. म्हणूनच या वाटेवरून जाताना जणू घरातच चालतोय इतक्या मोकळेपणाने तो चालत असे.

गेल्या काही दिवसांपासून या वाटेवरून जाताना



"मग आज किती लिटर अश्रू वाहिले?"

मधुरा आपल्याच तंद्रीत होती.

"तू.... तू म्हणजे अगदी दगड आहेस. तुला स्वतःला काही भावना तर नाहीतच, पण दुसऱ्यांच्याही भावना तू समजून घेऊ शकत नाहीस." मैत्रेयी संताप व्यक्त करीत म्हणाली.

मधुरा किंचित हसली.

"दुसऱ्यांच्या भावना मी नाही, तू समजून घेत नाहीस. तू कधी स्वतःच्या आईबाबांना समजून घेतलंस? तुझ्या अशा वागण्याने त्यांना किती त्रास होतोय, याची तुला जाणीव आहे? केवळ साखरपुडा झाला, म्हणून तुझ्यासाठी उदयन सर्वस्व झाला; पण ज्या आईबाबांनी तुला जन्म दिला, त्यांना तुझं हे तीळतीळ मरणं सहन होईल का? मुलीचं लग्न हा प्रत्येक आईवडिलांचा आनंदाचा क्षण असतो. तू त्यांना या आनंदापासून वंचित ठेवते आहेस. का? तर उदयनच्या स्मृतीसाठी. किती दिवस या स्मृती सोबत करतील? कधी ना कधी जोडीदाराची तुलाही आवश्यकता भासणारच आहे."

मधुराचा एक-एक शब्द मैत्रेयीला विव्हल करून गेला. ती मधुरेकडे बघतच राहिली.

'ही मुलगी किती वास्तव विचार करू शकते? हिला इतकं कसं सुचतं? आपण फक्त उदयनचाच विचार

करत राहिलो. हिने आपला, आपल्या आईबाबांचाही विचार केला.' तिला जाणवलं, 'आपण आईबाबांसाठीतरी लग्न करायला हवं.' तिने कृतज्ञतेने मधुराचा हात हातात घेतला. शांत स्वरात म्हणाली,

"थँक्स, मला जागं केल्याबद्दल. बाबांना सांग मी लग्नाला तयार आहे."

भूतकाळाचा पडदा मैत्रेयीच्या डोळ्यांसमोरून नाहीसा झाला. मैत्रेयी भानावर आली. त्यावेळी ते दुःखाचे क्षण स्वतः जगणारी मैत्रेयी आतामात्र त्याकडे तटस्थपणे बघत होती. तिला स्वतःचेच हसू आले. 'किती अविचारी होतो आपण? फक्त तीन महिन्यांच्या आठवणींशी आयुष्यभर एकनिष्ठ राहणार होतो. पण त्याक्षणी आपल्या भावना खोट्या होत्या का? तो केवळ भावनेचा भर होता का? माहीत नाही. त्यावेळी उदयन खरंच आपला जीव की प्राण होता. मग आज आपण ओंकारच्याही सहवासात इतके आनंदात कसे राहू शकतो? ओंकारशी लग्न झाल्यावर सुरुवातीचा शांतपणा, दुर्मुखता, अलिप्तता ओंकारने आपल्या खेळकर स्वभावाने घालवून टाकली. आपलं हरवलेलं चैतन्य परत आणलं.'

तिला मानवी मनाचं नवल वाटलं. 'मनुष्य हा प्रत्येक क्षण मनापासून जगत असतो. त्या क्षणांना प्रतिक्रियारूप त्याच्या काही हर्षखेदाच्या भावना असतात. त्या भावना



खोट्या नसतात. त्या क्षणांपुरतंच त्याचं काही त्या भावनांशी नातं असतं. काळ त्यावर परिणाम करणारा घटक आहे. म्हणूनच एकेकाळी आपला जीव की प्राण असलेला उदयन आता आपल्या सुखी आयुष्यातली आठवणींची एक झुळूक आहे. फक्त झुळूक.'

❖❖❖

(पूर्वप्रसिद्धी : १. 'रविवार पुरवणी', दै. लोकदूत, यवतमाळ, दि. १६–२–२००३
२. 'घरसंसार पुरवणी', दै. तरुण भारत, नागपूर, दि. १०–५–२००३)

चमकल्यासारखा वाटला.

‘कशावरून मनकर्णिका आपली वाट पहात असेल? तिनेतर कधी मान वर करूनही आपल्याकडे पाहिले नाही की आपल्या बोलण्याला काही उत्तर दिले नाही. तिच्या दृष्टीने या गोष्टी कधीच्याच विस्मृतीतही गेल्या असतील.’

हा आशेचा किरण सदानंदसाठी दिलासादायक ठरला. मनात कुठेतरी तो निश्चिंत झाला. एक महिन्याने गिरिजेशी त्याचा विवाह झाला आणि तीन महिन्यांनीच मनकर्णिकेच्या विवाहाची बातमी कळली. सदानंदाला मनावरचे मोठे ओझे उतरल्यासारखे वाटले.

सदानंदाचे देवळात जाणे पुन्हा सुरू झाले. त्या वळणावर अजूनही कधीकधी तो थबके; पण आता हे थबकणंही त्याच्या परिचयाचं झालं होतं. असेच दिवस गेले, वर्षे गेली. काळाने वादळाच्या सर्वच खुणा पुसून टाकल्या. आणि एक दिवस...

एक दिवस त्या वळणावर तो पुन्हा थबकला. ती. होय तीच. कृश काया, विझलेली नजर, हातात तशीच फुलांची परडी; पण तिच्यासारखीच त्यातली फुलंही कोमेजलेली. तो आश्चर्याने पाहातच राहिला. ती त्याला ओलांडून पुढे गेली तेव्हा तो भानावर आला. घरी परत आल्यावरही त्या धक्क्यातून तो बाहेर आला नव्हता. तिचं



त्याला स्वतःत बदल जाणवायला लागला होता. समोरचं ते वळण आलं की त्याची छाती नकळत धडधडायला लागे. हातांना किंचित कंप सुटे. डोळ्यांच्या बाहुल्या काहीतरी वेध घेत आणि समोर दिसे एक मूर्तिमंत शिल्प. हातात फुलांची परडी, नजर जमिनीवर झुकलेली. संथ पावले टाकीत ती येत असे. सदानंदाच्या मनाविरुद्ध त्याची नजर तिच्या अधोवदनाला निरखत राही. तिने मात्र कधीही मान वर करून त्याच्याकडे पाहिले नाही. ती शेजारून मागे जाईपर्यंत त्याच्या मनात कितीतरी वादळे आल्यासारखी त्याला वाटत. ती मागे गेली की ही वादळे कमी होत जात आणि तिच्या परडीतल्या फुलांचा... कदाचित तिचाच सुगंध केवळ त्याला जाणवत राही.

सदानंदाला स्वतःचंच आश्चर्य वाटे. पहाटे पूजा करून आल्यानंतर आधी मनात कितीतरी धार्मिक विचार रेंगाळत राहात. स्तोत्रे, आरत्या, मंत्र यांचाच घोष जणू मनात चालला आहे असं वाटे. पण आता चित्र बदललं होतं. तिने - त्या अनामिकेने त्याला वेड लावले होतं. सदानंदाच्या घरातलं वातावरण अतिशय धार्मिक आणि कर्मठ. वडील, पांडुरंगशास्त्री म्हणजे गावातलं आदरणीय व्यक्तिमत्त्व. त्यांच्या कडक शिस्तीत वाढताना खरंतर प्रेमाचा विचार करणेही पाप. पण सदानंदाला जाणीव झाली होती की आपण हे पाप केलंय आणि त्याने मनाशी

काहीएक निर्णय घेतला.

आज देवळात जाताना सदानंदाची अस्वस्थता पराकोटीला पोहोचली होती. वाऱ्यावर फडफडणारं सोवळं, हातात तीर्थपात्र, छातीवर रुळणारं जानवं, करारी चेहरा. वरवर पाहणाऱ्याला या धीरोदात्त मूर्तीमागील तळमळ कळणं शक्य नव्हतं. तिलातरी कुठे ठाऊक होतं? आज सदानंद त्या वळणावरून वळला. समोरून येणाऱ्या तिच्या मार्गात उभा राहिला. ती थबकली. हातातली परडी अधिकच घट्ट झाली. पदर अंगाभोवती लपेटल्या गेला.

सदानंद हळूच म्हणाला,

"नाव काय?"

"मनकर्णिका." परडीतल्या फुलांपेक्षाही नाजूक शब्द ओठांतून ओघळले.

सदानंदाच्याही नकळत पुढले शब्द निसटले,

"मी येईन तुझ्या घरी, तुझा हात मागायला."

क्षणभरच पापण्यांचा पडदा वर गेला. ओठांची हालचाल झाली. काहीतरी फुटू पाहणारं आतल्या आत दाबून टाकत मनकर्णिका झटकन मागे वळली. झपाझप पावलं टाकत घरात दिसेनाशी झाली. सदानंद शरीराने घरी आला. त्याचं मन मात्र हरवलं होतं रस्त्यातच. आपल्याच तंद्रीत तो घरात शिरला. आल्यावर पायावर पाणीही न घेता ओसरी ओलांडली. तेवढ्यात पांडुरंगशास्त्र्यांच्या कणखर



हाकेने अचानक जागा झाल्यासारखा दचकला.

"काय बाबा?" म्हणत वडिलांसमोर अदबीने उभा राहिला.

शेजारी बसलेल्या सदगृहस्थांकडे निर्देश करत ते म्हणाले,

"हे विष्णुपंत कुळकर्णी, पुण्याचे आहेत. यांच्या मुलीशी पुढल्या महिन्यात तुझा विवाह निश्चित केलेला आहे. यांना नमस्कार कर."

शब्द नाहीच जणू अंगारच ते. सदानंदाचं रोमरोम जाळून गेले. विचारशक्ती हरवल्यासारखा सदानंद बाबांकडे पाहातच राहिला.

"बघतोस काय शुंभासारखा. संस्कार विसरलास काय? नमस्कार कर म्हणतोय ना मी."

फाडकन थोबाडीत मारल्यासारखा सदानंदाचा चेहरा उतरला. यंत्रवत त्याने विष्णुपंतांना नमस्कार केला.

स्वतःच्या विवाहाचे कळल्यापासूनच सदानंदाने देवळात जाणे सोडले. कसा जाणार? मनकर्णिकेचा विचार जरी मनात आला तरी शरमेने तो काळवंडून जात होता. मग तिला प्रत्यक्ष तोंड देणे शक्यच नव्हते. रात्रंदिवस तिच्याशी केलेल्या प्रतारणेच्या विचारांनी त्याचा मेंदू शिणून जात होता. पण स्वतःच्या या अपराधाचे प्रायश्चित्त त्याला सापडत नव्हते. शेवटी या अंधाररात्रीत एक आशेचा किरण

म्हटलं होतं. जामगावसारख्या छोट्याशा खेड्यात राहणारी, दाराबाहेरही सहसा पाऊल न टाकलेली सरू. बाहेर किती सुंदर जग आहे, हे इतरांकडून ऐकणं, एवढंच तिचं विश्व. कदाचित मी मुंबईला राहतो, म्हणूनच तिने मला लग्नासाठी होकार दिला असावा. साखरपुड्याच्या दिवशी थोडासा एकांत मिळाल्यावर तिचं पहिलं वाक्य हेच होतं. पण लग्न करून घरी आणण्यासाठी पहिल्यांदा रेल्वेत, तिच्या भाषेत झुकझुक गाडीत बसल्यावर खिडकीतून दिसणारं जगही मी तिला देऊ शकलो नाही. 'सरूला बसू दे खिडकीत' असंही मी अर्ची आणि अज्याला खडसावून म्हणू शकलो नाही. मनात आलं, ही तर सुरुवात आहे. पुढे कसं?

स्टेशनवर उतरल्यावर माणसांची गर्दीच गर्दी पाहून आश्चर्यचकित झालेली, भराभरा धावणाऱ्या रेल्वे, लोकलचा खडखडाट, मधूनच ऐकू येणारी अनाउन्समेंट, गाडीवाले, फेरीवाले यांचा गोंगाट, हे सगळं ऐकून बावरलेली सरू, खरंच मुंबईत कितीतरी आश्चर्यकारक गोष्टी आहेत, याची कल्पना करणारी आणि प्रत्यक्षात प्रथमच पाहणारी सरू आपले मोठे डोळे आणखीनच मोठे करून एकाच वेळी सर्व मनात आणि डोळ्यांत साठवण्याचा प्रयत्न करीत होती. मी सरूचं निरीक्षण करीत होतो. तिच्या या निरागस सौंदर्याच्या वेगवेगळ्या भावच्छटांवर अजून अजून लुब्ध होत होतो.



विझलेपण त्याला राहूनराहून अस्वस्थ करीत होतं. तेवढ्यात आतल्या बायकांचे शब्द त्याच्या कानावर पडले.

"जोशांची मनू परत आलीय म्हणे."

"परत आलीय म्हणजे काय?"

"अहो नवऱ्याने टाकलीय तिला. म्हणत होता हिच्याशी संसार करण्यापेक्षा पुतळ्याशी संसार परवडला."

'काय, पुतळा? माझी मनू म्हणजे निर्जीव पुतळा?' सदानंदाच्या कानात जणू तप्तरस ओतला गेला. तो सबंध दिवस त्याने भयंकर अस्वस्थतेत काढला. दुसऱ्या दिवशी पूजा संपवून तो देवळाच्या पायऱ्यांवरच बसून राहिला. त्याच्या अंदाजाप्रमाणे थोड्या वेळाने मनकर्णिका आलीच. नेहमीप्रमाणे त्याच्याकडे न पाहता आत देवळात गेली. सदानंदाचे पायही आपोआप आत वळले. भक्तिभावाने हात जोडून उभी होती मनकर्णिका - नाही सदानंदाची मनू. सदानंदाचे मन भरून आले.

त्याने हळूवार साद घातली, "मनू."

अंधारात दिवे उजळावे तसे तिचे विझलेले डोळे उघडल्या गेले. हृदयाला घरे पाडणाऱ्या नजरेने तिने सदानंदाकडे पाहिलं.

"मनू, तू तेव्हा माझी वाट पाहिलीस का?"

जीवनातली सगळी आर्तता, सगळं दुःख त्या एकाच प्रश्नातून निथळत होतं.

तिच्या पापण्या थरथरल्या. ओठ दातांखाली दाबल्या गेले. गळ्याची खालीवर हालचाल झाली. आणि काही उत्तर देण्याच्या आत अश्रूंचा महासागर तिच्या डोळ्यांतून पाझरू लागला. शब्दांची गरज उरली नाही. पदर ओठांवर दाबत मनू बाहेर पडली. तेवढ्यात एक पाखरू चुकून गाभाऱ्यात शिरलं. भिंतीवर धडका देत राहिलं. जखमी होत आतल्याआत रडत राहिलं.

❖❖❖

(पूर्वप्रसिद्धी : १. 'रविवार पुरवणी', दै. लोकदूत, यवतमाळ, दि. १७–८–२००३)



# स्वप्नफुले

"ए काकू, मला बसू दे नं खिडकीजवळ." अर्ची चिवचिवली.

"नाही, खिडकीत मी बसणार." अज्याही भांडत म्हणाला.

सरूने माझ्याकडे आशेनं पाहिलं. मी अर्थातच लक्ष नसल्याचं भासवलं. सरू नाइलाजाने खिडकीजवळून उठली. माझ्या समोरच्या बाकावर बसली; पण तिचं लक्ष अजूनही खिडकीतून बाहेर दिसणाऱ्या गमतीजमतींकडेच होतं. डोळे खिडकीतून दिसणाऱ्या जगाच्या छोट्याशा तुकड्याचा वेध घेत होते.

"मला किनई मुंबईला गेल्यावर खूप खूप फिरायचं आहे." साखरपुड्याच्या दिवशी सरूने हळूच कानात

चमकत होते.

“हो, असं असतं बाहेर?” तिनं कुतूहलानं विचारलं. मी उत्साह भासवत ‘हो’ म्हटलं. तिला मी कितीही सांगितलं तरी अजून काय असतं, हा तिचा प्रश्न संपत नव्हता. हळूहळू तिला पेंग आली. ती या सर्वाची कल्पना करीत झोपी गेली. त्या रात्री झोपेतच कितीतरी वेळा ती हसत होती. मला एक मार्ग सापडला. त्या आठ बाय दहाच्या खोलीतच माझा आणि सरूचा प्रवास होऊ लागला.

“आज मी सुटीत राणीच्या बागेत गेलो होतो. तिथे खूप साऱ्या गमतीजमती होत्या.” मी अशी सुरुवात करताच सरूच्या चेहऱ्यावर उत्साह निर्माण होतो. ती एकटक माझ्याकडे कुतूहलानं बघत ऐकत राहते. ‘मग?’, ‘पुढे?’ अशाच शब्दांचा तिच्या बोलण्यात अधिकाधिक समावेश असतो. मी कल्पनेने राणीचा बाग रंगवून सांगतो. कारण मीही राणीचा बाग फक्त ऐकूनच असतो. माझ्याही कल्पनेला पंख फुटतात. ‘बापरे’ म्हणत मध्येच सरूचे डोळे विस्फारत जातात. माझ्या कल्पनेच्या पंखांना लोंबकळत तीसुद्धा राणीचा बाग फिरून येते. थकून झोपल्यावरही मनानं तिथंच फिरत राहते.

जगाचं खोटं वर्णन ऐकूनही त्याला खरं मानून आनंदीत होणारी सरू आणि वास्तवाची जाणीव असूनही



त्या दिवशी घरात पाऊल टाकल्यापासून आज एक महिना झाला तरी सरू पुन्हा बाहेर पडू शकली नव्हती. रोज उशीरा घरी परतल्यावर दार उघडून उत्साहाने स्वागत करणारी सरू आजतरी आपल्याला हे बाहेर नेतील, या आशेवर माझ्या अवतीभोवती घोटाळत असे. पण जसजसे दिवस जाऊ लागले, तसतसा तिचा उत्साह कमी होत गेला. एक उदास तरंग तिच्या चेहऱ्यावर उमटू लागला. दररोज संध्याकाळी डोळ्यांत प्राण आणून वाट पाहणे आणि दिवस मावळल्यावर निराश होऊन कामाला लागणे, एवढाच तिचा उद्योग उरला.

आता घरी आल्यावर तिच्या नजरेला नजर देणे म्हणजे मला मोठी शिक्षा वाटू लागली. लग्न होऊन फारसे दिवस झाले नव्हते, तरी घरी जाताना माझे पाय जड व्हायचे. निष्पाप सरूचा चेहरा डोळ्यांपुढे यायचा. तिची एक छोटीशी इच्छाही मी पूर्ण करू शकत नव्हतो. एका खाजगी कारखान्यातला साधा कामगार होतो मी. सुटी घेतली तर विनापगारी घ्यावी लागायची. काम पूर्ण केल्याशिवाय लवकर घरीही जायला मिळायचं नाही. कारखान्यातून घरी जायला दोन तास लागायचे. रात्र व्हायची. नोकरी टिकवणंही भाग होतं.

मोठा भाऊ एका दुकानात हलकंफुलकं काम करायचा. वहिनी पार्टटाईम टायपिस्ट म्हणून जायची.

आईबाबा म्हातारे. घरातच असायचे. दादाची मुलं अर्ची आणि अज्या यांचं शिक्षण, तीन खोल्यांचं भाडं, कमावणाऱ्यांपेक्षा खाणाऱ्यांची तोंडे अधिक. माझ्या दृष्टीने सगळंच प्रतिकूल. नैराश्य आणणारं. पण सरू त्या छोट्याशा संसारातही अतिशय सुखी होती. घरातली सगळी कामे करूनही ती प्रसन्न असे. मिळेल त्या पगारात घर चालवायची कलाही तिला अवगत होती. तिचं फक्त एकच स्वप्न होतं, फिरायला जायचं. पण....

आठ बाय दहाचं स्वयंपाकघर म्हणजे आमचा रंगमहाल होता. सरूला तोही स्वर्गासारखा वाटायचा. आज सकाळपासून काय काय झालं, शेजारी भांडण कसं झालं, पलीकडच्या आजी कशा घसरून पडल्या, ठाकरेंकडे उषाला पाहायला आलेले पाहुणे कसे होते अशा कितीतरी गोष्टी तिला मला सांगायच्या असायच्या. त्या सांगताना तिचा कोवळा चेहरा उत्साहानं फुलायचा. मीसुद्धा रस असल्याचं दाखवत तिची बडबड ऐकून घेत असे. रोज सगळ्या बडबडीचा शेवट 'उद्यातरी तुम्ही लवकर याल ना? मग आपण बाहेर फिरायला जाऊ' असाच असायचा. मी 'हो' म्हटल्यावर उद्याच्या सुखस्वप्नात ती वेडाबाई झोपी जायची.

दिवसांमागून दिवस गेले. माझ्या दिनचर्येत फरक पडला नाही. एकदा सरूची नेहमीप्रमाणे बडबड सुरू होती. पण मध्येच ती थांबली. थोडासा विचार करून



म्हणाली,

"काय हो, रोज मीच किती बोलत असते? तुम्हीतर काहीच बोलत नाहीत. तुमच्याजवळ किती बोलण्यासारखं आहे. तुम्हीतर रोज बाहेर जाता."

सरू अपेक्षेने माझ्याकडे बघत राहिली. काय बोलावं, मलाही प्रश्नच पडला. रोज कामावर जाताना दिसणारी लोकांची गर्दी, लोकलमधली धक्काबुक्की, कारखान्यातलं वातावरण, यंत्रांचा खडखडाट, मालकाचं ओरडणं, मित्रांची अरेरावी, मन खाऊन टाकणाऱ्या काळज्या, पैशांची ओढाताण हे सगळं सांगायला मी सुरुवात केली.

"मी लोकलने कारखान्यात जातो. खिडकीजवळ बसतो. मोकळी हवा खातो. बाहेर दिसणारा समुद्र पाहतो. शेजारच्यांशी गप्पा मारतो. लोकलमधून उतरल्यावर कारखान्याकडे जाणारा रस्ता खूप सुंदर आहे. दुतर्फा झाडे, रस्त्यांच्या मध्यभागी फुलांची रोपटी, पक्षांचा मंजुळ स्वर, सोबतचे मित्र, त्यांच्याशी बोलता बोलता कारखाना केव्हा आला, तेच समजत नाही. तिथे मालकाशी आजच्या कामाची चर्चा होते. कालच्या कामाची मालक शाबासकी देतात. काम करतानाही वरती पंख्याचा गार वारा, उदबत्त्यांचा सुगंध, मध्ये मिळणारी सुटी, सुटीतलं जेवण सगळं कसं खूप छान वाटतं."

मी बोलत असताना सरूचे डोळे आनंदाने

"माहिती होतं तू नाही म्हणणार आहेस." सुरेश संतापाने बोलला. तत्पूर्वीही तो बरंच काही बोलला होता. पण शेवटच्या प्रश्नाने त्याने मला सर्वात जास्त अस्वस्थ केलं. सुरेश आणि माझ्यात असणाऱ्या दरीचं या प्रश्नाच्या नकारात्मक उत्तराने समर्थनच होणार होतं. पण मी 'हो' तरी कसं म्हणणार होतो? कदाचित सुरेशने मी 'हो' किंवा 'नाही' म्हणण्याच्या अपेक्षेने मला हा प्रश्न विचारलाच नव्हता. त्याला फक्त आमच्या दोघांतली दरी स्पष्ट करायची होती.

मला ते सगळं आठवून पुन्हा अस्वस्थ व्हायला लागलं. नकळत डोळे भरून आले. मी ते गालावरून तसेच वाहू दिले, डब्यातल्या लोकांची पर्वा न करता.

तसा 'पर्वा न करणं' हा सुरेशचा गुण होता. गल्लीबोळातून हाफचड्डीवर धावत सुटणं, लोकांच्या घरच्या झाडांची फळं चोरणं, मोठमोठ्याने गाणं म्हणत रस्त्यांवरून चालणं. शाळेत असताना याच त्याच्या मस्त्या मला मोहात पाडायच्या. नकळत मीही त्याच्यासोबत केव्हा सामील झालो, माझं मलाच कळलं नाही. प्रथम ओळख, नंतर मैत्री, नंतर दोस्ती आणि मग जिगरी यार. 'जिगरी यार' हा आमचा तेव्हाचा आवडता शब्द. पण हे सगळं सुरेशकडे असताना. घरी आल्यावर मात्र मी एक आज्ञाधारक मुलगा होतो.

आयुष्यात एकदाच सुरेश माझ्या घरी आला.



बायकोला कल्पनेच्या अंतराळात फिरवणारा मी, यातलं कोण अधिक केविलवाणं हे कोडं मला उलगडत नाही. उद्या कुठला प्रवास सांगावा, ह्या विचारांत मी झोपण्याचा प्रयत्न करतो. मनात हाच प्रश्न असतो की, उद्या जर सरूला कुठे नेण्याचा प्रसंग आला तर तिला कुठे नेऊ? आणि एवढीच भीती असते की मी सांगितलेल्या गमतीजमती प्रत्यक्षात तिथे नसल्याच तर?

❖❖❖

(पूर्वप्रसिद्धी : १. 'रविवार पुरवणी', दै. लोकदूत, यवतमाळ, दि. ७–३–२००४)

# दरी

'प्रकाश सावंत' रिझर्वेशन चार्टवर माझं नाव पाहून मी रेल्वेच्या डब्यात बसलो. डब्यात तशी गर्दीपण नव्हती. मी खिडकीजवळची माझी आरक्षित जागा गाठली. सामान ठेवलं. डॅडी स्टेशनवर येणार होते सोडायला; पण मीच त्यांना 'नाही' म्हटलं. न जाणो सुरेश स्टेशनवर आला तर? त्याची आणि डॅडींची भेट नको व्हायला.

घड्याळात नजर टाकली. गाडी सुटायला अजून एक तास बाकी होता. एक तास म्हणजे बराच वेळ. मी इतक्या लवकर कसा आलो? मला स्वतःलाच प्रश्न पडला. कदाचित सुरेश येईल हीच आशा. आलाच तर थोडा वेळ बोलता येईल. मनातलं अजून सांगता येईल. विचारता येईल. नकोच. पण नकोच तो यायला. आता काय बोलायचं?



कालच तर बोलून झालं सगळं. अनपेक्षित, धक्कादायक. सुरेशच्या मनात इतक्या गोष्टी साचल्या होत्या? मलातर कधीच त्या कळल्या नाहीत. इतका मी स्वतःच्या कोशात गुरफटलो होतो?

प्रत्येक वेळी तो तर बरोबरच होता. पत्रातून, सुटीत नेहमीच घरी आलो तेव्हा. पण माझ्या घरी कधीच नाही. नेहमी सुरेशच्याच घरी. त्याच्या गच्चीत. कितीतरी वेळ आमचा अड्डा जमायचा. मग मध्येच सुमती काहीतरी गरमागरम खायचं घेऊन यायची.

सुमती. हसरी, गोड, नाजुक सुमती. आधी आधी कितीतरी गप्पा मारणारी. अघळपघळ. पण हळूहळू शांत होत गेलेली. शेवटी शेवटी तर 'कधी आलास?', 'कसा आहेस?' या पलीकडे तिची वाक्ये गेली नाहीत. याच सुमतीशी 'लग्न करशील का?' असं सुरेशने विचारलं होतं. मी तर हादरलोच. माझ्या डोळ्यांसमोर आईबाबांनी निवडून ठेवलेल्या एकापेक्षा एक सुंदर, शिकलेल्या, श्रीमंत मुलींचे फोटो झळकले. माझी निवड त्यातलीच असेल असं नाही; पण सुमती? मी तर त्या दृष्टीने कधी तिचा विचार केला नाही. मित्राची बहीण, या पलीकडे बघितलंच नव्हतं सुमतीकडे.

"काय बोलतोस तू?" माझ्या तोंडून झटकन शब्द निघाले.

माहीत असतं. सांग, मग ही दरी नाही तर काय आहे?"

"नाही आपल्यात दरी असणं शक्य नाही."
मी आवेगाने म्हणालो.

"खरंच? मग करशील सुमतीशी लग्न?"

"...."

"प्रकाशऽऽ प्रकाशऽऽ" दुरून येणाऱ्या हाकांनी मी भानावर आलो. धावत धावत सुरेश येत होता. जवळ आला नि थोडावेळ धापा टाकत राहिला. मी नुसताच आनंदाने त्याच्याकडे बघत राहिलो. माझ्या गालावरचे अश्रू तसेच होते. सुरेशचेही डोळे भरून आले. माझे अश्रू पुसत तो म्हणाला,

"सॉरी यार, खरंच माफ कर. इतकं सगळं बोलायला नको होतं. पण मनावर ओझं असह्य झालं होतं. तू विसरून जा. तुझ्या नोकरीमुळे मला खरंच खूप आनंद झाला आहे. तू प्लीज विसरून जा सगळं." तो भराभर बोलत सुटला. एवढ्यात गाडीची शिटी वाजली. त्याने माझे हात गच्च पकडले. "तू अजूनही माझा जिगरी यार आहेस. आणि हो, सुमतीबद्दल बोललो, ते मनावर नकोस घेऊ. मी सहज म्हटलं होतं. सुटीत आला की घरी ये."

मला काय बोलावं सुचत नव्हतं. घशात आवंढा दाटून आला होता. गाडी हलली. तो गाडीबरोबर चालू लागला. कितीतरी दूरपर्यंत. गाडीने वेग घेतला. तो मागे



पण आईची बोचरी नजर, बाबांच्या कपाळावरच्या आठ्या. गल्लीत मोकाट फिरणाऱ्या कुत्र्याच्या पिल्लाला अचानक घरात आणावं, तसा सुरेश माझ्या आलीशान बंगल्यात बावरला होता. तेव्हाच मी ठरवलं, सुरेशला आपल्या घरी बोलवायचं नाही. स्वतःच्या घरी मात्र सुरेश अगदी वेगळा होता. मग बदल झाला कुठे?

मी कराडला इंजिनिअरिंगला ॲडमिशन घेतली, तेव्हा तो माझ्याबरोबर आला होता. माझं कॉलेज, होस्टेल, रूम सगळं असोशीनं पाहत होता. परत गेल्यावर त्याचं पत्रही आलं होतं. खूप उत्साही. माझ्या इंजिनिअर होण्याला त्याने मनापासून शुभेच्छा दिल्या होत्या.

दरवेळी सुटीत घरी आल्यावर स्वतःच्या घरी कमी आणि सुरेशकडेच मुक्काम अधिक असायचा. तेव्हाही मला काही जाणवलं नाही. आणि काल हा म्हणत होता, की आपल्यात दरी आहे? कसं शक्य आहे? माझ्यासाठी तर सुरेश अजूनही जिगरी यार आहे. पण सुरेशसाठी मी? कोणजाणे!

मला मिळालेली नोकरी, फ्लॅट, गाडी किती आनंदाने या सर्व गोष्टी सांगण्यासाठी मी सुरेशकडे गेलो होतो! गेल्यागेल्याच मी त्याला म्हटलं,

"चल आपल्या नेहमीच्या जागी. आज माझा मस्त मूड आहे. तुला खुशखबर सांगायची आहे."

सुरेश मंदसा हसला. खुंटीवरचा शर्ट अंगात अडकवून माझ्यासोबत चालायला लागला. रस्त्यात तो शांतच होता. मीही काही बोललो नाही. आमचा नेहमीचा कट्टा आला. तरीही तो शांतच बसला होता. मी म्हटलं,

"अरे विचारणार नाहीस, कोणती खुशखबर आहे ती?"

तो म्हणाला, "तुला नोकरी मिळाली. कदाचित फ्लॅट, गाडीसुद्धा."

"माय गॉड! तू कसं ओळखलंस?"

"त्यात काय? तुमच्यासारख्यांचं आयुष्य असं छान आखीवरेखीव असतं. मनासारखं शिक्षण, मनासारखी नोकरी." सुरेश शून्यात पाहून बोलत होता.

"काय बोलतोस तू हे? आणि तुमच्यासारख्यांचं म्हणजे काय? आपण दोघं काय वेगळे आहोत?"

सुरेश फक्त खिन्नसा हसला. दूर कुठेतरी पाहत राहिला. थोड्या वेळाने म्हणाला,

"तुला माझी खुशखबर सांगू?"

मी खुशीत येऊन म्हटलं, "हो, सांग ना."

"मला पलीकडच्या टायपिंग इन्स्टिट्युटमध्ये टायपिंग शिकविण्याची नोकरी मिळाली. काय, आहे की नाही खुशखबर?"

मला काय बोलावं सुचेना. थोडा वेळ कोणीच



काही बोललं नाही. मी दुखावल्या स्वरात म्हटलं,

"तुला वाईट वाटतंय का मला नोकरी लागल्याचं?"

सुरेशने माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला.

"हो, होतंय दुःख. का नाही होणार? मीही एक सर्वसामान्य माणूस आहे. मलाही आशाआकांक्षा आहेत. मघाशी तूच म्हणालास ना, आपण काही वेगळे आहोत का? मग प्रत्येक वेळी माझ्या इच्छाआकांक्षांना तिलांजली का? बारावीत मला तुझ्यापेक्षा जास्त मार्क होते; पण पैशाअभावी माझं पुढचं शिक्षण थांबलं. तुला मात्र पेमेंट सीटवरही ॲडमिशन तयार. शिक्षण संपल्यावर तुला नोकरीची ऑफर. मला टायपिंग शिकवायलाही चार ऑफिसेसचे दरवाजे ठोठवावे लागतात. नेहमी असंच काहीतरी.

मी तुझ्यावर जळत नाही रे; पण कुठेतरी मनाला खूप टोचतंय. या सगळ्याच गोष्टी आपल्या मध्ये येतात. तुला कदाचित जाणवत नाही; पण माझ्यासाठी ही एक मोठी दरी असते, जी मला तुझ्यापासून दूर करते. तुझ्यासाठी उद्या मुलींच्या रांगाही लागतील. पण माझी सुमती दरवेळी कोणत्यातरी मुलासमोर पोहे घेऊन जाताना तिचे डोळे भरून येतात. कुणाची तरी वाट पाहतात. पण तो जवळ असूनही तिच्यापासून खूप दूर आहे, हे तिलाही

पाहत होती. आपण जर तिच्या जागी असलो तर कधी आपल्या प्रियकराला वाट पाहायला लावायची नाही, असं स्वतःला बजावत होती.

आजही नेहमीप्रमाणे ती आलेली नव्हती. चारची वेळ ठरलेली; पण काटा पावणेपाचकडे झुकायला लागलेला. तो अस्वस्थसा काउंटरजवळ आला आणि इंद्रायणीला म्हणाला,

"मी एका मिनिटात जाऊन येतो. हे पुस्तक राहूद्या इथे."

"काय? ती आली नाही वाटत अजून?" इंद्रायणीच्या तोंडून पटकन निघाले.

तो चकित नजरेने इंद्रयणीकडे बघत राहिला. इंद्रायणीला वरमल्यासारखं वाटलं; पण दुसऱ्याच क्षणी तो हसून म्हणाला,

"हो पहा ना. रोजचंच आहे तिचं. वेळेवर कधीच येत नाही आणि मी मुर्खासारखा तिची वाट पाहात बसतो."

इंद्रायणीला मोकळं वाटलं. ती म्हणाली, "अहो, प्रेमात वाट पाहण्यातही मजा असते म्हणतात ना."

"मजा? अहो, एक दिवस ठीक आहे; पण रोजच? बरं, वेळ बदलवू म्हटलं तर आता उद्यापासून नक्की येईन, असं वचन देते. मी भाबडा तिच्यावर विश्वास ठेवतो



पडायला लागला. आमच्यातलं अंतर झपाट्यानं वाढू लागलं. त्याची आकृती लहान होत गेली. हलणारा हात आणि मग तो दिसेनासा झाला. खिडकीतल्या वाऱ्यानं माझे अश्रू सुकून गेले. मी विचारांत गढलो - सुमतीच्या.

❖❖❖

(पूर्वप्रसिद्धी : १. 'साहित्य मैफिल', दै. हिंदुस्थान, अमरावती, दि. ३१–१०–२००४
२. दीपावली विशेषांक, दै. लोकदूत, यवतमाळ, २००४)

# इंद्रायणी

तो.... सावळासा, उंच, रुबाबदार. चेहऱ्यावर श्रीमंतीचं तेज. आधुनिक राहणीमान. ती.... त्याला साजेशीच गोरीपान, उंच, मॉडर्न. अलीकडेच काही दिवसांपासून दोघे इथे यायला सुरुवात झाली होती; आणि साहजिकच लक्षवेधक असणाऱ्या या जोडीकडे हिचेही लक्ष वेधल्या गेले. ही.... इंद्रायणी. नगर वाचनालयात 'ग्रंथपाल' म्हणून काम करणारी. दिवसभर काउंटरवर बसून पुस्तकांची आदान-प्रदान, नोंदी करणे, पुस्तके व्यवस्थित लावून ठेवणे ही तिची कामे. वाचनालयात गर्दी तशी विशेष नसायचीच. त्यामुळे रिकामा वेळही भरपूर. वाचनालयातल्या पुस्तकांचे वाचन सुरूच; पण त्याचाही कंटाळा आला की वाचायला आलेल्या लोकांचे निरीक्षण करणे हा तिचा छंद. तसे बरेचसे म्हातारेकोतारे,



पेशंट अथवा काही गृहिणी वाचनालयात यायच्या. काही महाविद्यालयीन विद्यार्थी अभ्यासांच्या पुस्तकांसाठी यायचे; पण त्यांचीही संख्या कमीच. अशातच ती जोडी एक दिवस वाचनालयात आली आणि तिथला एकांत पाहून येतच राहिली. उगीच नावापुरतं एखादं पुस्तक काढायचं आणि त्याच्या आड दोघांनी गुलूगुलू बोलत रहायचं. इंद्रायणीला हे फारच मजेदार वाटायचं. वाचनालयातल्या त्या रूक्ष वातावरणात त्या दोघांची ती गंमत तिचं मनोरंजन करायची. मग हळूहळू ते त्यांचं भेटण्याचं ठिकाणच बनलं. नेहमीच तो तिच्यापेक्षा लवकर यायचा. इंद्रायणीकडून पुस्तक घेऊन त्याची पाने पलटवीत तिची वाट पाहत रहायचा. अस्वस्थसा. कधीकधी पुस्तक टेबलवरच ठेऊन 'एका मिनिटात बाहेर जाऊन येतो' म्हणून सांगून बाहेर पडायचा. आल्यावर सिगरेटचा भपकारा यायचा. शेवटी ती एकदाची यायची. आल्यावर भांडण, रुसणं, फुगणं, त्याच्या सिगरेट पिण्याबद्दल तिचं दटावणं; पण हे सगळं आवाज न चढवता. शेवटी बरेचदा तोच माघार घ्यायचा. मग त्यांच्यात समेट व्हायचा. पुन्हा गुलूगुलू सुरू.

इंद्रायणीसाठी हे नेहमीचंच झालं होतं. पहिले कुतूहल म्हणून ती त्यांच्याकडे पहायची; पण आता तीसुद्धा त्यांच्यात गुंतली होती. त्यांचे हळू आवाजातले बोलणे कान देऊन ऐकू लागली होती. कधी स्वतःला तिच्या जागी ठेऊन

होतो. भैरवीची वाट पाहता पाहता तुझे, सॉरी तुमचे निरीक्षण करणे हा माझा वेळ जाण्याचा एक मार्ग होता.”

इंद्रायणीने तिचं नाव ‘भैरवी’ आहे याची मनात नोंद घेतली. त्याने एकेरीवर येऊन बोलल्यामुळे तिच्या मनात थोडी खळबळ माजली. आपल्याशी याला काय बोलायचे आहे, हे तिला अजूनही समजेना.

“नकळत माझं मन तुझी आणि भैरवीची तुलना करायला लागलं. भैरवी एक निशिगंधाचं फुल, तर तू प्राजक्ताचं फुल. तू किती हळवी आणि कोमल, ती सुंदर, पण ताठ. तू पटकन समर्पित होणारी. ती समर्पणातही स्वत्व जपणारी. तिच्या नावातही शेवटच्या रागाची हुरहूर, दुर्गेचं रौद्र रूप, तुझ्या नावात पावित्र्य, शांतता, जीवनदायिनीचा स्पर्श. मी भैरवीवर निरतिशय प्रेम करतो; पण मला वाटतं, ती या प्रेमाला पात्र नाही. तिच्या आकांक्षा, तिची स्वप्नं यांना तिच्या जीवनात पहिलं स्थान आहे. मी दुय्यम गृहीत धरलेला. आताही तिला बंगलोरला नवीन नोकरी मिळते आहे; पण दोन वर्ष अमेरिकेत काम करत रहावं लागेल. नंतर इकडे येईल. त्यानंतर लग्न करू, असं म्हणतेय. मी नाही ऐकलं. माझ्या विरहाचं तिला काहीच दुःख नाही. मी वेडापिसा तिची क्षण, क्षण वाट पाहणारा आणि ती सहजपणे दोन वर्ष थांबायला सांगते आहे. माझी नोकरी, माझं स्टेटस तिला अपुरं आहे का? नाही, मला ती झेपणार



आणि ती असा विश्वासघात करते.”

आता तो गंभीर व्हायला लागला होता. कुठेतरी दुखावल्यासारखा वाटत होता. वातावरण हलकं करण्यासाठी इंद्रायणी म्हणाली,

“अहो, उशीरा का होईना, ती येते ना? काहीतरी काम निघत असेल वेळेवर.”

“एक दिवस ठीक आहे; पण रोजच? एका कंपनीत प्रोग्रामर म्हणून नोकरी करते ती. मला मोठं व्हायचं आहे, असं म्हणत असते. एखादं काम पूर्ण झाल्याशिवाय तिला चैन पडत नाही म्हणे. मग त्या कामासमोर ती मलाही विसरून जाते.”

“मग तुम्हीसुद्धा उशीरा येत जा ना; किंवा एखाद्या दिवशी येऊच नका. तेवढाच तिला धडा.”

“नको, मला ते जमणारच नाही. त्यापेक्षा मी असाच वाट पाहत राहील.” असं म्हणत तो चालायलाही लागला.

इंद्रायणीला खूप काहीतरी आपल्या मनाला भिडल्यासारखं वाटलं. त्याचं तिच्यावरचं प्रेम पाहून काहीतरी हरवल्यासारखं, काहीतरी हवं असल्यासारखं वाटलं. आपल्यालाही कोणीतरी असं खूप प्रेम करणारा, खूप काळजी करणारा सोबती हवाहवासा वाटू लागला. त्या दिवशी तिचं कामावर मनच लागलं नाही.

तो आता अधूनमधून ती येईपर्यंत इंद्रायणीशी बोलू लागला. मनमोकळी इंद्रायणीही त्याच्याशी बोलू लागली. सर्वसाधारण घरातली, सर्वसामान्य रूपाची, मर्यादित विश्व असलेली इंद्रायणी म्हणजे एक पारदर्शक काच होती. तिच्या स्वभावातला साधेपणा तिच्या वागण्याबोलण्यातून कळून येत असे. कदाचित तेच तिचे बलस्थान होते. आपल्या या साधेपणानेच ती समोरच्याला आवडू लागत असे. त्यालाही इंद्रायणीचे हे गुण कदाचित आवडायला लागले होते. तिची वाट पाहता पाहता तो आपलं निरीक्षण करतो आहे, असं इंद्रायणीला वाटत रहायचं. पण हे कसं शक्य आहे? हा आपला भासच आहे, असं समजावत ती आपलं काम करीत राहायची.

एक दिवस ती खूप उशीर न करता थोडी लवकर आली. इंद्रायणीलाही बरं वाटलं. आता पुन्हा पुस्तकाआड गोष्टी सुरू होणार, असं तिला वाटलं. पण आज मूड जरा वेगळाच होता. त्याच्या चेहऱ्यावर राग दिसत होता. रागाची तीव्रता जास्त होती. ती उत्साहात काहीतरी सांगू पाहत होती; पण तो ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हता. तिचं पुनःपुन्हा काहीतरी समजूत काढणं चालूच होतं. तो त्यात रस नसल्यासारखा इकडेतिकडे पाहत होता. शेवटी 'नाही नाही' अशी मान हलवत रागाने टेबलवर मूठ आपटून डोकं गच्च धरून तो बसला. ती



निराशेने, संतापाने काहीतरी म्हणत आपली पर्स सांभाळत निघून गेली. तो तसाच बसून राहिला. कितीतरी वेळ कुठेतरी एकटक पाहत. डोळ्यांत नैराश्य. इंद्रायणीला हे पाहून त्याची खूप दया येत होती. आता जाऊन त्याच्या केसांवरून हात फिरवावा, त्याचं सांत्वन करावं असं तिला वाटत होतं; पण ती त्याची तंद्री मोडायची वाट पाहत राहिली.

सात वाजले. वाचनालय बंद करण्याची वेळ झाली. सगळं वाचनालय रिकामं झालं. तो तसाच बसून होता. इंद्रायणी सगळी आवराआवर करून त्याच्याजवळ आली.

"घरी जायचंय ना?" तिने हळूच विचारले.

तो भानावर आल्यासारखा तंद्रीतून जागा झाला आणि तिला म्हणाला,

"थोडं बसता का माझ्यासोबत?"

ती शांतपणे त्याच्या समोरच्या खुर्चीवर येऊन बसली. त्याच्या बोलण्याची वाट पाहू लागली.

"मला तुम्हाला काही सांगायचंय."

याला काय म्हणायचंय, त्याची इंद्रायणीला काही कल्पना करता येईना.

"बोला ना!" ती म्हणाली.

"मी खूप दिवसांपासून तुमचं निरीक्षण करत

“काय? नाही, नाही. तू नोकरी करायचीच.” तो तिला दटावत म्हणाला.

“नाही रे, आधी लग्न...”

दोघं पुन्हा भांडत भांडत रस्त्याला लागली. इंद्रायणी त्या दोघांकडे पाहत राहिली. तिचा एक डोळा हसत होता, एक डोळा रडत होता.

❖❖❖



नाही. आताही जाताना ती म्हणाली, ‘तू इतका संकुचित विचारांचा असशील, असं मला वाटलं नव्हतं.’ मी संकुचित आणि ती काय उच्च विचारांची? माझ्यावर प्रेम आहे म्हणे! मग लग्न का नाही करत? मी तिच्यावर प्रेम केलं आहे, तिच्या करिअरवर नाही. मला माझं शिखर सर करू दे म्हणे, मग मी तुझीच आहे. पण मी तोपर्यंत तुझा राहणार नाही. इंद्रायणी, तू माझी होशील का? आपण दोघं लग्न करू आणि सुखात राहू”.

तो एकदम भावनाविवश झाला. त्याने इंद्रायणीचा हात हातात घेतला. त्याचा कंपित हात, त्याचा उष्ण स्पर्श, त्याचे आर्द्र डोळे, त्याची तिच्यापर्यंत पोचणारी हृदयाची धडधड आणि व्याकूळ नजर. इंद्रायणी काय पाहत होती? इतक्या वेळचे त्याचे बोलणे स्तब्धपणे ऐकणारी इंद्रायणी त्याच्या शेवटच्या वाक्याने मुळासकट वेल थरथरावी, तशी थरथरली. तिच्यासमोर तिचा आदर्श प्रियकर, तिच्या स्वप्नातला, तिची व्याकूळतेने वाट पाहणारा प्रियकर, तिच्या स्वप्नांच्याही पलीकडले असे ते चित्र. ती क्षणभर त्यात हरवून गेली, स्वप्नरंजनात गुंग झाली. त्यात ते दोघं राजाराणी, त्यांची कच्ची बच्ची, छोटसं घर. बस, एवढीच तर तिची स्वप्नं होती. तिच्या कपाळावर घर्मबिंदू जमा झाले. आता ‘हो’ म्हणून ती तिच्या स्वप्नांवरचा पडदा बाजूलाच करणार होती पण....पण क्षणभरच ती थबकली,

शांत झाली. त्याच्या हातातला हात काढून घेत तिने स्वतःच्या हातावर ठेवला. आपलाच हात तिला खूप अनोळखी वाटला. मनाचे दूरवर उडालेले पक्षी कसेबसे एका जागी गोळा करत तिने पिंजऱ्यात बंद केले. तिने एकवार स्थिर नजरेने त्याच्याकडे पाहिले. तो अजूनही अधीर नजरेने तिच्याकडे पाहत होता.

तिने सावकाशपणे बोलायला सुरुवात केली. "तुम्हाला खरंच प्रेम करता येतं?"

तो प्रश्नार्थक चेहरा करुन पाहू लागला.

"प्रेम म्हणजे काय? काही वेळ एखाद्या व्यक्तीवर प्रेम करायचं आणि तिचा एखादा गुण नाही आवडला की तिचा तिरस्कार करायचा? नाही ना? प्रेम करताना समोरच्याचे गुणदोष सगळेच आपले मानायचे असतात. तुमचं सिगरेट पिणं तिला आवडत नाही; पण तरीही तिने तुम्हाला स्वीकारलेच ना? मला माहिती आहे, तुम्ही भैरवीवर अतिशय प्रेम करता; आणि या प्रेमामुळेच एक हक्काची भावना तुमच्या मनात निर्माण झाली आहे. तुमची प्रेम करण्याची जी संकल्पना आहे, भैरवीनेही तसंच प्रेम करावं अशी तुमची इच्छा आहे. तुम्ही भैरवीवर प्रेम केलं, तिच्या व्यक्तिमत्त्वावर नाही. तिची स्वप्नं, तिच्या आकांक्षांमध्ये तुमचा काहीच सहभाग नसावा का? तिला साथ देण्याऐवजी तुम्ही तिला एकटं सोडता आहात. आता



भावनेच्या भरात तुम्ही मला मागणी घालता आहात. एखाद्या व्यक्तीला धक्का लागल्यावर तो एखाद्या खांबाचा आधार घेतो; पण धक्का ओसरल्यावर त्या खांबाची त्याला गरज नसते. तुम्हालाही मानसिक धक्का बसल्यामुळे तुम्ही माझा आधार घेता आहात. उद्या माझ्याशी लग्न केल्यावर भैरवीचं प्रेम तुमच्या मनातून पूर्ण नाहीसं होणार आहे का? उलट तिचा विश्वासघात केल्याची टोचणी तुम्हाला आयुष्यभर राहील. माझ्यातला समर्पण हा गुण तुम्हाला आवडला, मग तुम्ही तुमच्यात समर्पणाची भावना का नाही निर्माण करत? तुम्ही भैरवीवरचं प्रेम समर्पणाने सुशोभित करा.

माझ्या बोलण्याचा गंभीरपणे विचार करा. उद्या आपण पुन्हा भेटू. उद्याही तुमचा हाच विचार कायम असला, तर मी तुमच्या प्रस्तावावर विचार करेन."

इतके बोलून इंद्रायणी उठली. त्याला तिथेच ठेवून वॉचमनला कुलूप लावायला सांगून ती बाहेर पडली.

दुसऱ्या दिवशी तिच्या अपेक्षेप्रमाणे तो आणि ती म्हणजेच भैरवी दोघे हातात हात घालून आले. भैरवी इंद्रायणीजवळ येत म्हणाली, "थँक्स!"

इंद्रायणी हसत म्हणाली, "अभिनंदन!"

"कशाबद्दल?"

"नोकरीबद्दल."

"नाही, मी तो बेत कॅन्सल केला आहे."

करतो, असंही तिला वाटलं. इतक्यात चिनूच्या हातात तिला रोजच चॉकलेट दिसायला लागलं होतं. या ॲटोमामाला एकदा रागावलं पाहिजे. तिने मनात विचारही केला. इतके लाड करणं बरं नाही. पुढे तिला तशीच सवय लागणार.

तिने भिंतीवरील घड्याळाकडे पाहिलं. काटा पावणेतीनच्याही पुढे गेला होता. तिच्या येरझारा सुरू झाल्या.

"मी जरा भजनाला जाते गं." सासूबाई दार उडघडत म्हणाल्या. मृदुलेच्या येरझारा पाहून त्यांनी विचारलं,

"काय ग, चिनू आली नाही?"

मृदुलाचा स्वर तिच्याही नकळत ओलावला,

"नाही."

"अग येईल, तू घाबरू नकोस. मी थांबू का ती येईपर्यंत."

"नाही आई, तुम्ही जा ना, ती येईलच एवढ्यात." तिने उसने हसत म्हटले.

सव्वातीनला दार वाजले. मृदुला धावतच दाराकडे गेली. आता उद्या ॲटोमामाला चांगलेच रागवायचे. 'आधी चिनूला सोडत जा मग इतर मुलांना' असं खडसावून सांगायचं, असंही तिने मनात ठरवलं. दार उघडल्याबरोबर चिनू फाइव्ह स्टार नाचवत घरात शिरली. सोबत तिची बडबड चालूच होती. तिच्या येण्यामुळे मृदुलाच्या मनावरचा



# घुसमट

दोन चाळीस झाले, अजून चिनू आली नाही. रोज अडीचला येणारी दहाच मिनिटे वर झालीत. तरीही आली नाही, म्हणजे काही खूप काळजीचं कारण नाही; पण तरीही मृदुलाच्या येरझारा चालू झाल्या होत्या. तेवढ्यात दार वाजलं. दरवाजा उघडताच दप्तर इकडे, बूट तिकडे असं फेकत चिनूचा प्रवेश झाला आणि सोफ्यावर बसून ती आईला चॉकलेट दाखवत खायला लागली.

"कोणी दिलं ग चॉकलेट?" मृदुलाने विचारलं.

"ॲटोमामाने." तिने झोकात उत्तर दिलं.

"अरे वा! कशाबद्दल? सगळ्यांना दिलं का?"

"नाही, आज ॲटोमामाचा वाढदिवस होता, म्हणून फक्त मला चॉकलेट दिलं." असं म्हणत नाचत,

खेळत ती बाथरूममध्ये हातपाय धुवायला निघून गेली.

'चिनूलाच कसं काय ॲटोमामाने चॉकलेट दिलं? वाढदिवस आणि ॲटोमामाचा?' मृदुला स्वतःशीच हसली. ॲटोमामाची चिनू लाडकी होती. चिन्मयी होतीही तशीच. गोड, गोबरी, गोरीमोरी. कुरळ्या केसांच्या दोन वेण्या, त्यावर रिबिनी बांधल्या की एखादी बाहुलीच वाटायची. त्यातही हसली की तिच्या गालावर पडणाऱ्या खळ्या कोणालाही मोहूनच घ्यायच्या. ॲटोमामाने स्वतःच तिला कितीदा म्हटलं होतं, 'तुमची छोकरी खूप गोड आहे. सगळ्या मुलामुलींत सगळ्यांत हुशार.' मुलीची स्तुती ऐकून मृदुलाचंही हृदय अभिमानाने भरून यायचं.

मृदुलाची सकाळची शाळा. के.जी. टू मध्ये जाणारी चिन्मयी. तिची ११ ते २ अशी शाळा. घरात सासूबाई असायच्या. ॲटोमामा शाळेत सोडून देण्यासाठी फ्लॅटच्या दाराशी यायचा आणि सोडून जायचा. सर्व फ्लॅटमधील बऱ्याच मुलामुलींना सोडून देणे, आणणे हे त्याचे काम होते. त्यामुळे तो सगळ्या मुलांचे लाड करायचा. तो ओळखीचा होताच. पंचविशीचा, बारकासा, सावळासा. बोलायला मोकळा, विश्वासू. त्यामुळे मृदुलेला चिन्मयीच्या शाळेत येण्याजाण्याची काळजी वाटत नव्हती.

मंगेश दोन वर्षांसाठी कोल्हापूरला गेलेला. घरात तिघीच; पण प्रेमळ सासूबाई आणि खोडकर चिन्मयी



यांच्यासोबत मृदुलेला कधी एकटेपणा जाणवला नव्हता.

"आईगं, माझा टॉवेल." चिन्मयीने आवाज दिला. मृदुला टॉवेल घेऊन तिच्याकडे आली. हातपाय खसाखस पुसून दिले. कपडे बदलण्यासाठी शाळेचा ड्रेस काढला. तेव्हा तिच्या पोटावर थोडेसे लालसर झाल्यासारखे वाटले. तिच्या गोऱ्या कातडीवर पुरळासारखा दिसणारा तो लालसरपणा उठून दिसत होता.

"हे काय गं?" मृदुलाने चिनूला विचारले.

पण तिचं लक्ष नव्हतं. आई खाली बसून कपडे बदलवून देत असली, की आईच्या केसांशी खेळत बसणे, हा तिचा आवडता उद्योग होता. ती आताही त्यातच रमली होती. इकडेतिकडे धावाधाव करता करता मृदुलाच्याही मनातून ती गोष्ट निघून गेली.

आता चिनूला यायला रोजच उशीर होत होता. कधी पावणेतीन कधी तीन. मृदुलाला तेवढ्यापुरती काळजी वाटायची. तिने ॲटोमामाला विचारलेही,

"रोज कसा रे उशीर होतो?"

तेव्हा तो हसत म्हणाला, "ताई, तुम्ही राहता शाळेपासून सगळ्यात दूर. बाकी सगळ्या मुलांना सोडता सोडता उशीर तर होणारच ना! तुम्ही काही काळजी नका करू ताई, मी आहे ना. मी तिला बरोबर सोडतो घरी."

मृदुलालाही बरं वाटलं. आपण उगाच काळजी

तर आपली शंका बरोबरच आहे’, असं तिला वाटलं. आता काय करावं, याचा विचार करत तिचा रात्रभर डोळ्याला डोळा लागला नाही.

दुसऱ्या दिवशीही काय करायचं, याचा निर्णय झाला नव्हता. सकाळी डोकं दुखतंय असं सांगून ती शाळेत गेली नाही. चिनूच्या शाळेची वेळ झाली तसा तिचा जीव खालीवर होऊ लागला. चिनूला शाळेत पाठवूच नये, असं तिला वाटत होतं. पण सासूबाईंना काय सांगणार? ती स्वतःच तिच्या शाळेची तयारी करून सोडायला निघाली. थोडी लवकरच निघाली तरी खाली ॲटोमामा भेटलाच. ‘आई, ॲटोमामा’ म्हणून चिनू ओरडली आणि मृदुलेच्या हृदयाची धडधड तिला स्वतःलाच ऐकू येईल एवढी वाढली. तिने त्याच्याकडे लक्षच न देता आपल्या रस्त्याने चालायला लागली. तो मागे आलाच.

“काय झालं ताई, चिनू शाळेत नाही येत का?” त्याचा आवाज ऐकल्याबरोबर मृदुलेचं अवसान गळालं. घशाला कोरड पडली. तो नेहमीसारखा हसत तिच्यासमोर उभा होता. तिला क्षणभर त्याच्या मुस्कटीत दोनचार माराव्यात, अशी इच्छा झाली; पण तिची तेवढीही हिंमत नव्हती.

मृदुला काही बोलत नाही, हे पाहून तो पुन्हा म्हणाला, “ताई, शाळेत न्यायचं नाही?”

“न...नाही, मीच तिला सोडतेय.” असे म्हणून



ताण निवळला. आता स्वारीला भूक लागणार म्हणून मृदुला किचनमध्ये नाश्त्याचं करायला गेली.

“चिनू रोज रोज असे चॉकलेट खायचे नाहीत. ॲटोमामाला सांगून दे, माझे दात किडतात म्हणून.”

चिनू अजून चॉकलेटमधून बाहेर आली नव्हती. त्याचे कव्हर काढत गोल फिरत आईच्या मागे मागे आली.

“आई, ॲटोमामाचा रोजच कसा ग बर्थ डे असतो? माझा बर्थ डे तर किती दिवसांनी येतो.”

“का ग? असं तू का विचारतेस?” मृदुलेलाही तिच्या प्रश्नाची गंमत वाटली.

“अगं, तो ना रोज मला बर्थ डे आहे, म्हणून चॉकलेट घेऊन देतो. सगळ्या मुलांना सोडल्यावर खूप दूरच्या दुकानात घेऊन जातो अणि चॉकलेट दिल्यावर खूप खूप पप्प्या घेतो. खूप गुदगुल्या करतो.”

चिनूची बडबड चालली होती पण मृदुलाचा चेहरा इकडे पांढराफटक पडला होता. तिच्या हातातला चाकू भाजीऐवजी तिच्या बोटात घुसला; पण तिचे लक्ष नव्हते. तिला एकाएकी आजूबाजूच्या सर्व वस्तू गोल फिरत असल्याचा भास झाला. भीतीची एक लहर पोटातून मस्तकाकडे गेल्यासारखी वाटली. ती स्तब्ध उभी असली तरी तिला भरभरून चक्कर आली. तिने सावरायला ओट्याचा आधार घेतला. चिनू मात्र चॉकलेट खात बडबड करत

स्वतःभोवती गिरक्या घेतच होती. मृदुलेला तिच्या पोटावरच्या लालसरपणाचा अर्थ उमगला. कशीबशी भेलकांडत धावत ती चिनूजवळ गेली. तिच्या हातातलं चॉकलेट फेकून देऊन तिने तिला गच्च पोटाशी धरले. खूप घट्ट, खूप जोरात. चिनू कळवळली. आधीच आईने चॉकलेट फेकून देण्याचा तिला राग आला होता.

"आई, काय गं हे?" असं म्हणत तिची मिठी सोडवू लागली; पण मृदुलेला तिला क्षणभरही दूर करायचं नव्हतं. जणू तिला घट्ट धरून पुन्हा गर्भाशयाच्या सुरक्षित पोकळीत सामावून घ्यायचं होतं. शेवटी चिनू रडायला लागली. आपली आई अशी का करते आहे, तिला समजतच नव्हतं. 'आई सोड ना' म्हणून जोराने रडायला लागल्यावर मृदुला भानावर आली. तिने चिनूला सोडलं. चिनू पटकन आईला सोडून दूर झाली. आईकडे वेगळ्याच नजरेने पाहत आपल्या बाहुलीशी खेळायला आपल्या खोलीत निघून गेली.

मृदुला अजूनही सावरली नव्हती. तिला स्वतःचे अनुभव आठवले. 'काय? दोन वर्ष मिस्टरांपासून दूर, तुम्हाला करमत नसेल ना?' असं डोळे मिचकावत फिदीफिदी हसणारे ओळखीचे चेहरे आठवले. 'मॅडम, कसं फ्रेश फ्रेश यावं, म्हणजे मुलांनाही बरं वाटतं की!' असं आपादमस्तक न्याहाळत म्हणणारे शाळेचे मुख्याध्यापक तिला आठवले.



बसमध्ये येता जाताना होणारे गलिच्छ ओंगळवाणे स्पर्श कसे दुर्लक्षित करायचे याचा तर आता सराव झाला होता. पण ही घाण आपल्या मुलीपर्यंत पोचलेली पाहून तिला एकदम कोसळल्यासारखं वाटलं. तिला स्वतः यापासून कसं दूर राहायचं हे माहिती होतं. 'पण चिनू? माझी निरागस चिनू. तिला मी यापासून कसं वाचवू, की आतापासून पुरुषजातीविषयी तिच्या मनात तिरस्कार भरवून तिचं सामान्य जीवन नाहीसं करू? की तिला घरात कोंडून जगापासून दूर ठेवू? की मी सतत तिच्यासोबत राहू? घरात, बाहेर, शाळेत, रस्त्यावर... कुठेकुठे वाचवू मी तिला?'

मृदुलेच्या मनात विचारांचा कल्लोळ उठला. मंगेशला फोन करावा का? इथल्या काळजीने आधीच तिकडे त्याला करमत नाही. हे कळलं तर तो नोकरी सोडूनच परत यायचा. सासूबाईंना सांगितलं तर त्यांचं बी.पी. वाढेल. कॉलनीतल्या सगळ्या मुलांना, शेजारच्यांना सांगावं तर नेहमी नेणारा ॲटोमामा म्हणून यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. तिला काही समजेनासंच झालं. 'ॲटोमामा, आपला नेहमीचा ॲटोमामा असं करेल? नाही, शक्यच नाही. त्याच्यावरून तर असं काही वाटत नाही. तो तर सगळ्याच मुलांचे किती लाड करतो. मग चिनूच आपल्या मनाचं काहीतरी सांगत असेल का? आपलाच काहीतरी गैरसमज. नाही, हे शक्य नाही. एकूण परिस्थिती पाहिली

# मोबदला

चुलीजवळचा पसारा आवरून रखमेने दोन घास पोटात ढकलले. राजूलाही भराभर जेवण्याची सूचना केली. दहाचा भोंगा वाजून गेला होता. म्हणजे आज थोडासा उशीरच होणार, असं तिला वाटलं; म्हणून घाईघाईने ती झोपडीबाहेर पडली. राजूलाही घराबाहेर काढलं आणि कडी अडकवून झपाझप पावलं टाकत रोजच्या रस्त्याने निघाली. राजू तिचा पदर धरून तिच्या मागेच चालत होता.

रस्त्याने चालताना राजूला इकडेतिकडे बघत रमतगमत चालावेसे वाटे. आई इतक्या भराभर का बरं चालते, हे त्याला कधी कळत नसे. एखाद्या ठिकाणी तो जास्त रेंगाळत काही बघत बसला की रखमेच्या पदराला



मृदुला तरातरा चालायलाही लागली. तो मागून 'ताई, ताई' असा आवाज देतच होता. मृदुलेला धावत सुटावं असं वाटलं. तिने पटकन एक ॲटो थांबवला आणि त्यात बसून ती निघून गेली.

दुसऱ्या दिवशीही ती स्वतः शाळेत गेली नाही. चिनूला तयार करून पुन्हा तिला तिच्या शाळेत सोडून देण्यासाठी खाली उतरली तर तो समोर तयारच होता.

"काय ताई? आज तरी पाठवताय ना शाळेत?" तो नेहमीच्याच स्वच्छ नजरेनं मोकळं हसत बोलला.

मृदुलाला थोडावेळ स्वतःचंच काही चुकतं आहे की काय, असं वाटलं.

"आई, मी जाते ना ॲटोमामाच्या सोबत." तिचा हात ओढत चिनू म्हणाली.

तो तिच्याकडे पाहून हसला आणि चिनूला ॲटोकडे न्यायला म्हणून त्याने हात समोर केला. मृदुलाने त्वेषाने त्याचा हात झिडकारून टाकला.

"काय झालं ताई?" ॲटोमामा गोंधळून पाहतच राहिला.

"काय झालं, ते तुला चांगलं माहिती आहे." मृदुला स्वरात पूर्णतः तिरस्कार ओतत म्हणाली. मृदुलाच्या या वाक्याने क्षणात त्याची स्वच्छ नजर गढूळली. वेगळ्याच छटेने त्याचे डोळे चमकायला लागले. ओठांच्या कोपऱ्यातून

छद्‌मी हसत तो म्हणाला,

"तुम्ही काय बोलताय ताई मला काही कळत नाहीये."

"चूप बस, नीच माणसा, लहान मुलीशी असं वागताना तुला लाज नाही वाटत?"

तिचा संताप, चीड पाहून तो आणखीनच चेकाळल्यासारखा हसला आणि म्हणाला,

"मग काय मोठ्या मुलीशी असं वागू?" आपल्याच बोलण्यावर तो गडगडाट करीत हसला. त्याचं हे भेसूर हसणं तिला एखाद्या राक्षसासारखं वाटलं. तिचं संपूर्ण शरीर थरथर कापायला लागलं. तिचा सारा जोर एका मनगटात आला आणि बाजूलाच खेळत असलेल्या एका मुलाची बॅट तिने हातात घेतली. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच तिने ती बॅट त्याच्या अंगावर जीव खाऊन मारली. अशा अनपेक्षित हल्ल्याने तोही गडबडला. त्याच्या धक्याने खाली कोसळला. तिचा संताप अजूनही शांत झाला नव्हता. त्या बॅटचे फटक्यांवर फटके ती त्याला मारत सुटली होती. आजूबाजूचे लोक जमा झाले होते; पण तिला त्याचं भान नव्हतं. तिला ॲटोमामामध्ये फिदीफिदी हसणारे ओळखीचे चेहरे दिसत होते, मुख्याध्यापक दिसत होते, बसमधले ते अनोळखी प्रवासी दिसत होते. आपला संपूर्ण जोर असेपर्यंत ती त्याला मारत राहिली. भेदरलेली चिनू



आईच्या या संतापाकडे बघत बाजूला उभी होती. शेवटी लोकांनी तिला बाजूला केलं. अंगातली सगळी शक्ती संपल्यासारखी ती मटकन खाली बसली. आता तिचा राग शांत झाला होता. कधी झुरळालाही न मारणारी मृदुला आज समोर विव्हळत पडलेल्या ॲटोवाल्याकडे शांतपणे पाहात होती. आता तिच्या मनाला दिलासा मिळाला होता, की हा ॲटोमामा माझ्या मुलीच्या वाट्याला जाणार नाही. प्रश्नार्थक चेहरे घेऊन उभ्या असलेल्या लोकांना तसेच ठेवून तिने आपल्या मुलीला कडेवर उचलले आणि शाळेच्या दिशेने चालू लागली.

❖❖❖

बसल्याबसल्या झोप लागली. थोड्या वेळाने रखमेने त्याला हलवून जागे केले.

"झोपलास कारं? चाल दुसऱ्या घरी जाचं हाय."

राजू टुणकन उडी मारून उभा राहिला. पाटलांच्या घरी जायला त्याला फार आवडे. त्यांच्या मागच्या अंगणातून आतल्या खोल्या दिसत. तेथे खेळणारी छोटी छोटी मुलं, त्यांची खेळणी पहायला त्याला फार मजा येई. तो सरकत सरकत मागच्या दरवाजाजवळ पोचल्यावर रखमा त्याला लगेच आवाज देई, "मांगं व्हय रं. गपगुमान बस जागेवर."

तो हिरमुसला होऊन आपल्या जागेवर जाऊन बसे. तरीही दुरून का होईना, त्याला त्यांची खेळणी दिसत राही. आताही पाटलांच्या घरी जाण्यासाठी तो खुषीत उठला आणि रखमेपाठोपाठ निघाला.

"काय म्हनत व्हती गं मालकीणबाई?" त्याने मध्येच विचारले.

"काऊन? काई तं न्हाई." तिला त्याच्या प्रश्नाचा रोख कळलाच नाही.

"न्हाई, म्हंजे तुझं कौतिक करत व्हती का कापडं धुतली म्हून?" त्याने विचारलं आणि रखमा जोरजोरात हसायला लागली.



हिसका बसे. 'लवकर पाय उचल की रं मुरद्या' म्हणून पाठीत एक धपाटा बसे. राजूला हे नवीन नव्हतं. त्यामुळे ओशाळत, हसत तो पुन्हा धावत आईच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करी.

शाळेला सुट्या लागल्या की नेहमीच राजू रखमासोबत कामावर जाई. रखमाने शंकऱ्याला – म्हणजेच राजूच्या 'बा'ला – किती वेळा म्हटलं की 'तू घरी असतोस, तर राजूला तुझ्यासोबत घरीच ठेवते.' पण शंकऱ्याला गावभर हुंदडण्यातच जास्त रस होता. राजूला घेऊन घरी राहायचं त्याच्या जीवावर येई. शेवटी रखमाच राजूला प्रत्येक ठिकाणी सोबत घेऊन जाई. आताही ती राजूला घेऊन देशमुखांच्या घरी कामाला निघाली होती. पावसाला वेळ असल्यामुळे उन्हाचा तडाखा जास्तच वाढला होता. राजू आपली झिजलेली स्लीपर फटाक् फटाक् वाजवत चालत होता. रखमाच्या पायात काहीच नव्हतं. राजू रखमाच्या पायाकडे पाहून म्हणाला,

"आये, तुले चटके न्हाई बसत?"

"न्हाई रं राजा, तुले बसतात का चटके?"

"न्हाई, पर माह्मं डोक्सं लय तापल्यागत वाटतंया."

हे ऐकून रखमाने त्याचं डोकं आपल्या फाटक्या पदराने झाकून घेतलं.

“देशमुखाकडलं पैसं आलं की तुले टोपी घेऊन देईन रं राजा.”

असे म्हणून तिने त्याचा मुका घेतला. मग राजू टोपी कशी घ्यायची, या सुखस्वप्नात दंग झाला.

देशमुखांचं फाटक उघडून रखमा अंगणातून मागच्या परसदारी गेली. मागच्या मोकळ्या मोरीत धुण्याभांड्यांचा पसारा पडला होता. राजूला सावलीत बसवून ती कामाला लागली. तेवढ्यात देशमुखबाई बाहेर आल्या.

“काय गं रखमे, आज इतका उशीर का बरं केलास? तुला माहिती आहे नं, मला अकरा वाजता जावं लागतं.”

“चूक झाली मालकीणबाई. उद्यापासून लवकर येईन.” रखमा अजिजीच्या सुरात म्हणाली.

“रोजचंच नाटक असतं तुमचं हे.” असे पुटपुटत देशमुखबाई आत गेल्या.

राजू कोपऱ्यातून पाहत होता. त्याला मालकीणबाईचा खूप राग आला. ‘सकाळपास्नं माय किती कामात होती! बाजूच्या दुर्गाकाकूला बरं नव्हतं, म्हणून तिला मायनंच सैपाक करून दिला. बाने काल आणलं नाही, म्हणून मायच रेशनच्या रांगेत उभं राहून गहू, तांदूळ घेऊन आली. बाचा कोणीतरी दोस्त आला म्हणून च्यापानी करत होती.’ हे सगळं त्याला मालकीणबाईला ओरडून



सांगावंसं वाटलं; पण तो जागीच चुळबुळत बसला.

थोड्या वेळाने मालकीणबाई शिळ्या अन्नाचं पुडकं घेऊन आली. पुडकं पायरीवर ठेवून तिने ते रखमाला घेऊन जाण्यास सांगितलं. राजूला त्यात काय आहे, हे पाहण्याची खूप इच्छा झाली. तो मायजवळ येऊन म्हणाला,

“आये, ते मले खायला दे ना वं!”

रखमा त्याच्यावर जोरात ओरडली, “आताच जेवलास ना रे घोड्या? आनू इतक्या लौकर भूकबी लागली? जा बस गुमान तिकडे.”

राजूला मायचा खूप राग आला. तो पुन्हा आपल्याजागी येऊन बसला आणि रागारागाने मायकडे पाहू लागला. ती कपडे धुण्यात गुंतली होती. दोन मोठ्या बादल्या कपडे – तेही भर उन्हात उभी राहून – धूत असल्यामुळे तिच्या अंगातून घामाच्या धारा निथळत होत्या. त्याचा आईवरचा राग पळून गेला. तिची खूप दया आली. ती मन लावून कपडे धूत होती. बदाबदा आपटत होती. मळलेल्या जागी साबण लावून ब्रशने खसाखसा घासत होती. आधी मळकट दिसणारे कपडे तिच्या हाताखालून गेल्यावर स्वच्छ होऊन तारेवर लटकत होते. त्याला आपल्या मायचा अभिमान वाटला. इतके स्वच्छ कपडे धुतल्यावर मालकीणबाई नक्कीच खूष होणार. आपल्या मायला शाबासकी देणार, असे त्याला वाटू लागले. विचारांच्या तंद्रीत त्याला

राजूच्या मनात हलकल्लोळ माजला होता. प्रामाणिकपणे कष्ट करणारी माय, चोरीचा खोटा आरोप लावणारी आणि पाकीट सापडल्यावरही परत कामावर न बोलावणारी मालकीण या समाजनीतीपुढे त्याची विचारशक्ती तोकडी ठरली होती. प्रामाणिक श्रमाचा मिळालेला मोबदला मात्र त्याला प्रत्यक्ष बघायला मिळाला होता.

❖❖❖

समाप्त

❖❖

❖



"कापडं धुतली तं कोनी कौतिक करतं व्हय? यडाच हायेस." तिला लेकराच्या बोलण्याची गंमत वाटली.

राजू हिरमुसला झाला; पण पाटलाचं घर पाहून त्याची कळी खुलली.

दुसऱ्या दिवशीही राजू रखमेसोबत कामावर निघाला. आज रखमा लवकर निघाली होती. देशमुखांचं घर आल्यावर ती नेहमीसारखी मागच्या अंगणात गेली आणि काम करायला लागली. तेवढ्यात देशमुखबाई तरातरा बाहेर आल्या.

"काय गं रखमे, काल ह्यांच्या पँटच्या खिशातलं पाकीट घेतलंस तू?"

"न्हाई जी, कंचं पाकीट? मले तर काईच मालूम न्हाई. काल कपड्यांमध्ये कंचंच पाकीट नव्हतं. राजूला विचारून घ्या." रखमाने थरथरत्या आवाजात सांगितलं.

"काल कपड्यांमध्ये ह्यांचं पाकीट तसंच राहिलं होतं. आज ते दिसत नाही आहे. मग तू नाही तर कोणी घेतलं? तुझ्या पोराला काय विचारा? चोराचा पोरगा खरं बोलणार आहे का?" देशमुखबाई तुच्छतेने म्हणाल्या.

रखमाच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी वहायला लागलं. "न्हाई बाई, माझ्या पोराची आन हाय, मले कोन्तंच पाकीट दिसलं न्हाई."

मालकीणबाईंना पाहून राजूचा राग अनावर झाला. "काऊन वं बाई, माह्या मायले काऊन रडवता? माही माय कंदीच खोटं बोलत न्हाई." तो जिवाच्या आकांताने मालकीणबाईंवर ओरडला.

"तू बाजूला हो रे कारट्या. एवढंसं पोर आणि मला दम देतंय. माज आलाय ना जास्तीचा. चला चालते व्हा इथून. उद्यापासून कामावर येण्याची काही गरज नाही." देशमुखबाई ओरडल्या.

रखमा अजूनही हुंदके देत होती. हे मोठं काम सुटलं, तर तिला खूप अडचण जाणार होती. ती रडत रडत राजूला घेऊन बाहेर पडली. माय रडते आहे, म्हणून राजूपण रडत होता. आज त्याला पाटलांकडेही जायला उत्साह वाटत नव्हता.

घरी आल्यावर रखमा डोक्याला हात लावून बसली. आता एक तारखेला कामाचे पैसे मिळणार, म्हणून ती आनंदात होती; पण त्या आधीच देशमुखबाईंनी तिला कामावरून कमी केलं होतं. आता दुसरं काम मिळेपर्यंत हाल होणार होते. राजूही कोपऱ्यात गुडघ्यात मान घालून बसला होता. आता आपल्याला टोपी मिळणार नाही, हे त्याला कळून चुकलं होतं. त्याच्या इवल्याशा जिवाला आपल्या इतक्या चांगल्या मायसोबत असं का व्हावं, तेच कळत नव्हतं.



दुसऱ्या दिवशी रखमाने हिंमत करून पुन्हा देशमुखांचं घर गाठलं. झाल्या दिवसाचे तरी पैसे द्या, अशी विनंती केली. त्यावर 'पाकीटातले पैसे एकाच दिवसात उडवले का?' असे म्हणून देशमुखबाईंनी तिला वाटेला लावलं.

काही दिवसांनी शेजारची दुर्गा रखमाकडे आली.

"काय वं रखमे, नवं काम भेटलं का?"

"न्हाई वं, अजून शोधणंच चालू हाय."

"आवं त्या देशमुखबाईनं तुले जे पाकीट घेतलं म्हून कामावरनं काढलं, ते त्याइच्या न्हाणीतच सापडलं म्हणे. बाईच्या नवऱ्यानंच तिथं ठिवलं व्हतं."

"तुम्हाले कोनं सांगतलं?"

"त्याइच्याकडे पलीकडची शांती काम करते न्हवं, तिनंच सांगतलं."

"मंग तर देशमुखीन बाई नक्कीच माई आठवन करत असंन."

"कुठचं वो माय, कोन्त्या तोंडानं त्ये आपला गुना कबूल करंन? शिरीमंताचं काई खरं नसतं वं रखमे. त्यांच्या रागालेबी कारन लागत न्हाई आन् खुषीलेबी न्हाई. तू त्याइचा नाद सोडून दे."

रखमा एकदम उदासून गेली. पण त्याहीपेक्षा